मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in

E mail - dainikyuvakaadhar@gmail.com

facebook : yuvakadhar

# दैनिक युवक आधार मराठी

तरुणांचा बुलंद आवाज

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १३३ ■ मंगळवार, २० जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

त्वरित पत्रकार पाहिजेत !
महाराष्ट्र व देशासह जगभरात डिजिटल माध्यमातून पोहचणारे दैनिक
PRESS
दैनिक युवक आधार मराठी
महाराष्ट्रातील सर्व जिल्हे,तालुका, जिल्हा परिषद सर्कल,लोकसभा, विधानसभा या क्षेत्रांमध्ये पत्रकार पाहिजेत
अधिक माहिती साठी संपर्क
श्री संतोष शिवदास आमले
संपादक - ९२२०४०३५०९



मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १३३ ■ मंगळवार, २० जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# महाराष्ट्र पोलिसांची मोठी कारवाई, भिवंडीत 44 जणांना अटक

## 470 जणावंर गुन्हा दाखल; भाजप कोणार्कचा हायव्होल्टेज ड्रामा

भिवंडी : महापालिकेतील कोणार्क विकास आघाडीचे विजय उमेदवार आणि माजी महापौर विलास पाटील यांच्या बंगल्यावर हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात माजी महापौर प्रतिभा पाटील जखमी झाल्या आहेत. जखमी प्रतिभा पाटील यांना उपचारसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हल्ला करणारे आमदार महेश चौघुलेंच्या मुलाचे समर्थक असल्याचा आरोप होत आहे. या हल्यामुळे विलास पाटलांच्या समर्थकांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात ठिय्या मांडला... पोलिसांकडून आंदोलकांवर लाठीचार्ज केल्याची माहिती समोर येत आहे. भाजप कोणार्क राड्या प्रकरणी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. दोन्ही गटातील 44 जणांना अटक करण्यात आली आहे. 470 अनोळखी अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच दोन्ही गटातील 16-16 कार्यकर्त्यां एफआयआर मध्ये नावे आहेत.

रविवारी रात्री 9 वाजताच्या सुमारास माजी महापौर विलास पाटील यांच्या घरावर दगडफेक करण्यात आली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात दोन्ही गटांमध्ये जोरदार दगडफेक झाली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे पाहून पोलिसांनी जमावाला पांगवण्यासाठी लाठीचार्ज केला. या घटनेनंतर पोलिसांनी पहाटेच कारवाई केली आणि विलास पाटील यांच्या बंगल्यावर उपस्थित असलेल्या 36 जणांना ताब्यात घेतले. तसेच आमदार महेश चौगुले यांच्या गटातील आठ जणांनाही ताब्यात घेऊन संध्याकाळी भिवंडी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. यावेळी न्यायालयात पोलिसांकडून चोख बंदोबस्त तैनात करण्यात आल्याने न्यायालयात छावणीचे स्वरूप निर्माण झाले होते.

रात्रीच्या वेळी झालेल्या या पोलिस कारवाई नंतर आमदार महेश चौघुले गटा कडून विलास पाटील गटावर चार गुन्हे दाखल करण्यात आले. तर माजी महापौर विलास पाटील यांनी महेश चौघुले यांच्या विरोधात दोन गुन्हे दाखल केले आहेत. परस्पर गुन्ह्यात दोन्ही गटाकडून जवळ-जवळ 470 अनोळखी लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. मात्र या प्रकरणी दोन्ही गटातील 16-16 आरोपीची नावे दाखल एफआयआर मध्ये दाखल केलेली आहेत.

दरम्यान, पोलिसांनी न्यायालयात हजर केलेल्या विलास पाटील गटातील 36 आरोपींपैकी एकाही आरोपीचे नाव पोलीसानी दाखल केलेल्या एफआयआर मध्ये नाही. निव्वळ संशयावरून त्यांना कोर्टात हजर केले होते. तसेच विलास पाटील यांच्या समर्थकांवर चाकूने हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले असताना देखील त्याचे कोणते ही वैद्यकीय प्रमाणपत्र पोलिसांनी कोर्टात सादर केले नाही. तसेच याप्रकरणी पोलिसांनी एकतर्फे भुमिका बजावली आहे. या प्रकरणी निपक्ष्यपाती तपास करण्यात यावा. तसेच वकील संघटने कडून जॉईंट सीपी कडे मागणी करण्यात आली आहे की सदरचा तपास भिवंडी गुन्हे शाखेकडे देण्यात यावा. अशी माहीती विलास पाटील यांचे वकील नारायण आयर यांनी दिली.

## बनावट मद्य प्रकरणी दोघांवर कारवाई

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी**

राज्य उत्पादन शुल्क पनवेल शहर विभाग यांनी बनावट मद्य विक्री करणाऱ्या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून एकूण 78 हजार रुपयांचा मद्य जप्त करण्यात आला.

राज्य उत्पादन शुल्क पनवेल शहर विभाग, निरीक्षक यांना 16 जानेवारी रोजी रात्री साडेआठच्या सुमारास खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात दोन इसम बनावट विदेशी मद्यची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्या ठिकाणी सापळा रचण्यात आला. यावेळी खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात दोन संशयित इसम प्रवासी बॅगा खांद्यावर घेऊन जात असताना त्यांची तपासणी केली या बॅगमध्ये बनावट विदेशी मद्य सापडून आले. ते मद्य वसई वरून आणले असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानुसार वसई येथील आरोपीच्या घरी छापा टाकला असता बनावट मद्यने बॉटलिंग केलेल्या बाटल्या, गोवा राज्य निर्मित आणि विक्रीसाठी आणलेल्या विदेशी मद्याच्या रिकाम्या प्लास्टिक बाटल्या, दादरा नगर हवेली निर्मित आणि विक्रीसाठी असणाऱ्या विदेशी मद्याच्या रिकाम्या काचेच्या बाटल्या आणि इतर बाटल्या जप्त करण्यात आल्या. असा एकूण 78 हजार 188 किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## ज्येष्ठ नागरिकांची तीर्थक्षेत्र दर्शन सहल



**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू ; संपादक नागपूर विभाग**

ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान नागपूर व अमरनगर जेष्ठ नागरिक मंडळ नागपूर यांचे संयुक्त विद्यमाने 18 जानेवारी रोजी तीर्थक्षेत्र खडकी, केळझर व बृहस्पती मंदिर, शनी मंदिर चौकी येथे प्रतिष्ठानचे सचिव राजूजी मिश्रा यांचे मार्गदर्शनाखाली सहल आयोजित करण्यात आली होती. सहलीमध्ये 50 जेष्ठ नागरिकांनी सहभाग घेतला. सहल यशस्वी करण्याकरिता मंडळाचे अध्यक्ष देविदासजी आगरकर, सचिव वसंतराव इझनकर, उपाध्यक्ष गणपतराव निंबाळकर, रमेश जिल्हारे, रामदास माहुरे, डॉ. राजेश कुऱ्हाडे, राजेश्वर डगरवार, गणपतराव निंबाळकर, रमेश जिल्हारे, विलास वाकडे, सौ. शोभा आगरकर,भोयर, एड. अरमरकर, सौ. रासेकर, सौ भोयर, ज्योती निंबाळकर, सौ ढोले, सौ. इझनकर यांनी सहल यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

## वरुड नगरपरिषदेत नाभिक समाजाला प्रतिनिधित्व प्रविण सावरकर यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सौरव डांगरकर अमरावती**

वरुड : भारतीय जनता पक्षाचे लोकप्रिय व सर्वसमावेशक नेते, राज्यसभेचे सदस्य मा. अनिलभाऊ बोंडे तसेच मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे आमदार व भाजप नेते श्री. चंदुभाऊ यावलकर यांच्या पुढाकाराने वरुड नगरपरिषदेत नाभिक समाजाला प्रतिनिधित्व मिळाले आहे. चुडामणी दर्शन न्यूज पेपरचे संपादक श्री. प्रविण सावरकर यांची नाभिक समाजाचे प्रतिनिधी म्हणून स्वीकृत नगरसेवक पदावर निवड करण्यात आली आहे.



मनमिळाऊ स्वभाव, सततची धडपड आणि सर्व समाजाशी बांधिलकी या गुणांमुळे प्रविण सावरकर हे सर्वसामान्यांमध्ये लोकप्रिय असून, त्यांच्या या निवडीमुळे नगरपरिषदेत सर्व घटकांचा आवाज अधिक सक्षमपणे मांडला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या निवडीमुळे नाभिक समाजात आनंदाचे वातावरण असून, समाजाच्या प्रश्नांना नगरपरिषदेत प्रभावीपणे वाचा फोडली जाईल.

पत्रकारिता क्षेत्रात प्रामाणिकपणे कार्य करणारे प्रविण सावरकर आता सामाजिक जबाबदारीच्या भूमिकेतून शहराच्या विकासासाठी योगदान देतील, असा विश्वास समाजबांधवांनी व्यक्त केला आहे.

भाजप हा ओबीसी प्रवर्गातील संख्येने लहान असलेल्या समाजांना राजकीय प्रतिनिधित्व देण्यासाठी अग्रेसर असून, त्यामुळेच अनेक लहान समाज या पक्षाशी जोडले गेले आहेत, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या निवडीबद्दल मा. अनिलभाऊ बोंडे व आमदार श्री. चंदुभाऊ यावलकर यांचे नाभिक समाजाच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहेत. ही माहिती महाराष्ट्र नाभिक महामंडळ पश्चिम विदर्भ प्रदेशाचे सरचिटणीस श्री. ज्ञानेश्वर डांगरकर यांनी दिली आहे.

## वीर शिरोमणी महाराणा प्रताप सिंह यांच्या पुण्यतिथी निमित्त वाकद. येथे अभिवादन कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**रिसोड. प्रतिनिधी.**

रणजितसिंह ठाकुर. वाकद येथे शौर्य स्वाभिमान आणि राष्ट्रवादीचे प्रतीक असलेले वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह जी यांच्या पुण्यतिथी निमित्त आज वाकद येथे अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला, कार्यक्रमाची सुरुवात वीर शिरोमणी श्री महाराणा प्रतापसिंह जी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलन करण्यात आले यावेळी लखनसिंह ठाकुर यांनी महाराणा प्रतापसिंह जी यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या शौर्य



त्याग आणि राष्ट्रभक्तीचा आदर्श युवकांनी व नवीन पिढीने घ्यावे असे आवाहन करण्यात आले या कार्यक्रमांमध्ये राजपूत समाज बांधवांसह लखनसिंह ठाकुर विजयसिंह परिहार नारायण सिंह चौहान अमरदीपसिंह चौहान विलास मोरे धनंजय मोरे गजानन पैठणकर सुनील लाटे बंडूभाऊ डहाके बाळासाहेब देशमुख . दामू दादा गरड मा जिल्हा परिषद सदस्य शिवलाल बिजोरे गजानन तिरके अमोल आनंदराव देशमुख हरीसिंह भाटी दुर्गासिंह ठाकुर अंकुश देशमुख राहुलसिंह परिवार नंदूभाऊ मगर मनोज देशमुख संतोष खरात लखनभाऊ मित्र मंडळाचे सदस्य हजर होते.

## राष्ट्र सर्वोपरि भाव जागवणारे राष्ट्र सेविका समितीचे सघोष संचलन पनवेलमध्ये संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

भारतीय संस्कृती बाबत अभिमान जागृती, राष्ट्र सर्वोपरी हे ब्रीद घेऊन आणि सुखमय सुसंघटित समाज निर्मिती चे उद्दिष्ट समोर ठेऊन गेली ९ दशके राष्ट्र सेविका समिती कार्यरत आहे. याच उद्दिष्टाचा एक भाग म्हणजे संघटितपणे शिस्तबद्ध पद्धतीने केलेले सघोष संचलन. मकर संक्रांतीच्या निमित्ताने आयोजित केले जाणारे संचलन यावर्षी रायगड जिल्ह्यात पनवेल येथे आयोजित करण्यात आले होते.

नूतन गुजराथी विद्यालयाच्या प्रांगणात सुरुवात करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळा - विसावा हॉटेल- ज्योती आहार भवन- हनुमान मंदिर- सीकेपी हॉल- विरुपाक्ष मंदिर- कर्मवीर भाऊराव पाटील स्मारक- वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह- शिवाजी महाराज स्मारक या मार्गाने हे संचलन गुजराथी शाळेमधे संपन्न झाले. यामध्ये पेण, पनवेल, खालापूर आणि उरण या चार तालुक्यांचा सहभाग होता. एकूण १७९ सेविका आणि जवळपास १०० नागरिक, संघ बंधू यांनी देखील या संचलनाला हजेरी लावली. कोकण प्रांत व्यवस्था प्रमुख कांचन ताई पंडित उपस्थित होत्या तर रायगड जिल्हा पालक मंजूषा ताई शेंडे, जिल्हा व्यवस्था प्रमुख मंजुषा भावे, जिल्हा सह-व्यवस्था प्रमुख विजया औंधेकर, जिल्हा पर्यावरण गतिविधी प्रमुख ज्योती कानिटकर हा अधिकारी वर्ग ही उपस्थित होता.

नेत्रतज्ञ संगीताताई जोशी यांना प्रमुख अतिथी म्हणुन आमंत्रित केले होते. त्यांनी संचलना ला शुभेच्छा दिल्या. कांचनताई पंडित यांनी त्यांच्या उद्बोधनात राष्ट्रसेविका समितीच्या 90 वर्षांच्या वाटचालीचा उल्लेख करून कोकण प्रांतातील शाखांच्या प्रगतीची माहिती दिली. राष्ट्र सेविका समिती हे देशातील महिलांचे सर्वात मोठे व सर्वात जुने संघटन असून आपण राष्ट्र निर्मितीसाठी समाजातील चुकीच्या पद्धती दुरुस्त करून आपल्या आचरणातून नवा आदर्श समाज समोर ठेवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. राष्ट्र सर्वोपरी हा भाव सर्व कुटुंबांमध्ये जागृत होणे आवश्यक आहे आणि ज्या प्रमाणे शरीर विविध अवयवांना एकत्र घेऊन काम करते त्याप्रमाणे समितीने सर्व समाज घटकांना एकत्र घेउन काम करायचे आहे. असे आपल्या उद्बोधनात त्यांनी नमूद केले. संपूर्ण वंदे मातरम संचलनाची सांगता झाली.



## श्रीक्षेत्र माहूर गड येथे माहिती रथयात्रेचे क्षेत्रीय समितीचे सहअध्यक्ष प्राध्यापक कैलासजी खसावत यांच्या हस्ते उद्घाटन..!



**दैनिक युवक आधार**
**श्रीक्षेत्र माहूर : /प्रतिनिधी: सय्यद ईसा**

शिख सांप्रदायातील हिंद की चादर श्री गुरुतेग बहादूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दी समागम उपक्रमाचे धर्म जागरण समिती व महाराष्ट्र सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन केले आहे. गुरु परंपरा आणि श्री गुरुतेग बहादूरसिंग साहेब यांचा इतिहास जन माणसांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यभर हिंद की चादर या नावाने माहिती रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या रथयात्रेचे नांदेड मध्ये श्री शेत्र दत्त शिखर येथे रथयात्रेची पूजन करून प्राध्यापक कैलास जी खसावत यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी परमपूज्य चिंतामणजी भारती महाराज.

यांच्यासह अनेक स्वयंसेवकांची यावेळी उपस्थित होते

यामध्ये प्रमुख्याने सागर राठोड मनीष राठोड गोपाल नाईक यांची उपस्थिती होती.

# संपादकीय..

## सुरसम्राट कुंदनलाल सैगल

हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ गायक व पहिले सुपरस्टार कुंदनलाल सैगल यांची आज पुण्यतिथी. कुंदनलाल सैगल यांचा जन्म ११ एप्रिल १९०४ रोजी जम्मू येथे एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे वडील अमरचंद सैगल हे जम्मू काश्मीर संस्थानात मामलेदार होते तर आई केसरबाई या गृहिणी होत्या. त्यांच्या आईला संगीताची खूप आवड होती. धार्मिक कार्यक्रमात त्या भजन, किर्तन गात त्यामुळे लहान वयातच कुंदनलाल सैगल यांच्यावर संगीताचे संस्कार झाले. त्यांच्या आई याच त्यांच्या संगीतातील पहिल्या गुरू होत्या. कुंदनलाल सैगल यांनी संगीत कलेचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेतले नव्हते पण युसुफ नावाच्या व्यक्तीकडून त्यांनी संगीताचे प्राथमिक धडे गिरवले होते. अर्थजनासाठी त्यांनी टाईपरायटर विक्रेत्याचे काम केले पण संगीतावरील प्रेमापोटी त्यांनी ते काम सोडून छोट्या मोठ्या मैफलीत गायला सुरुवात केली. त्यांच्या गायनाने प्रभावित होऊन बी. एन. सरकार यांनी त्यांना न्यू थिएटर साठी करारबद्ध केले. १९३२ साली त्यांनी चित्रपटात अभिनय करायला सुरुवात केली. पण त्यांचे पहिले तीनही चित्रपट चालले नाही. १९३३ साली आलेला पुरण भगत नावाचा चित्रपट मात्र खूप गाजला. या चित्रपटाने त्यांची गायक आणि नायक म्हणून चित्रपट सृष्टीला ओळख करून दिली. १९३५ साली आलेल्या देवदास या चित्रपटाने त्यांना सुपरस्टार बनवले. या चित्रपटात त्यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. या चित्रपटातील त्यांचा अभिनयही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. दीदी, साथी, सूरदास, तानसेन, जीवनमृत्यू हे त्यांचे चित्रपटही खूप गाजले. १९४६ साली प्रदर्शित झालेला शारजहाँ हा चित्रपट देखील खूप गाजला. १९४७ साली आलेला परवाना हा चित्रपट त्यांच्या मृत्यूनंतर प्रदर्शित झाला. हा चित्रपट देखील यशस्वी झाला. एक बंगला बने न्यारा..., करू क्या आस निरास भाई..., सो जा राजकुमारी सो जा..., बाबुल मोरा...., जब दिल ही तूट गया... ही त्यांनी गायलेली गाणी अजरामर झाली. आजही ही गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. कुंदनलाल सैगल यांच्या गायनाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांच्या गायनातील उत्स्फूर्तता आणि सहजता, आर्त दर्दभरा आवाज आणि प्रत्येक गाणे भावपूर्णतेने गाण्याची वैशिष्ट्यपूर्ण शैली त्यामुळे त्यांची गाणी रसिकांच्या मनाला भिडत. कुंदनलाल सैगल यांनी भजन, किर्तन, ठुमरी, गझल, अंगाई गीत, बाल गीत, विरह गीत अशी सर्व प्रकारची गाणी गायली. हिंदी सोबतच त्यांनी उर्दु, बंगाली, तामिळ या भाषेतील चित्रपटातही भूमिका केल्या. त्यांनी ३६ चित्रपटात भूमिका केल्या तर १८५ गाणी गायली. मुकेश, मोहम्मद रफी या महान गायकांवर सुरवातीच्या काळात सैगल यांच्याच गायन शैलीचा प्रभाव होता. हे महान गायक सैगल यांनाच आपला आदर्श मानत. १८ जानेवारी १९४७ रोजी कुंदनलाल सैगल यांचे निधन झाले. कुंदनलाल सैगल यांचे निधन होऊन आज ७९ वर्षे झाली तरीही त्यांच्या गायनाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. कुंदनलाल सैगल हे खऱ्या अर्थाने भारताचे सुरसम्राट आहेत. आज त्यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह २०२६ निमित्त ट्रक कंटेनर चालकांची मोफत वैद्यकीय तपासणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल | प्रतिनिधी**

राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह २०२६ च्या अनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त (वाहतूक), नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन पनवेल वाहतूक शाखेच्या वतीने एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रकाश सपकाळ यांच्या विद्यमाने आज दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ०२.०० वाजेपर्यंत लायन्स क्लब पनवेल यांच्या सहकार्याने JWC यार्ड, पळस्पे येथे ट्रक व कंटेनर चालक तसेच तेथील स्टाफ यांची मोफत वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

या वैद्यकीय शिबिराचे आयोजन लायन्स क्लब पनवेल व अपोलो हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. रस्ते सुरक्षेच्या दृष्टीने ट्रक व कंटेनर चालकांचे आरोग्य सक्षम असणे अत्यंत आवश्यक असल्याने त्यांच्या आरोग्य तपासणीवर विशेष भर देण्यात आला.

या मेडिकल कॅम्पमध्ये चालकांची पुढील तपासणी करण्यात आली—

उंची (Height)
वजन (Weight)
रक्तदाब (BP)
रँडम ब्लड शुगर
ईसीजी (ECG)
डोळयांची तपासणी (Eye Check-up)
डॉक्टरांचा सल्ला (Doctor Consul-tation)
कॅल्शियम तपासणी


सदर शिबिरात ४० ते ५० ट्रक व कंटेनर चालकांनी सहभाग नोंदवून वैद्यकीय तपासणी करून घेतली.

या कार्यक्रमास लायन्स क्लब पनवेलचे लायन नागेश देशमाने, लायन सौ. ज्योती नागेश देशमाने, लायन सुरभी पेंडसे, अपोलो हॉस्पिटलच्या डॉक्टरांची टीम तसेच नवीन पनवेल वाहतूक शाखेचे वपोनि श्री. प्रकाश सपकाळ, पो. हवा. संजय गावडे, जितेंद्र कदम, ज्ञानेश्वर वाघ आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने रस्ता सुरक्षा व आरोग्य जनजागृतीसाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम उपस्थितांकडून कौतुकास्पद ठरला.

## गौरव गायकवाड यांची पंचायत समिती निवडणुकीसाठी जोरदार तयारी



**दैनिक युवक आधार**
**पनवेल/प्रतिनिधी :--**

पनवेल तालुका पंचायत समिती निवडणूकीसाठी राजकीय हालचालीनां वेग आला असून शिवसेना शिंदे गट पक्षाकडून करंजाडे भागातील युवा तडफदार कार्यकर्ते गौरव गायकवाड हे इच्छुक उमेदवार आहेत. जणसामान्यांतुनसुद्धा गौरव गायकवाड यांना उमेदवारी देण्याची मागणी होत आहे. त्यानुसार गायकवाड यांनी जोरदार तयारी सुरु केली आहे.

नुकत्याच झालेल्या राज्यातील 29 महापालिकांच्या निवडणुका झाल्या आहेत. या निवडणुकीत भाजप व एकनाथ शिंदे गट शिवसेनेने बाजी मारली. त्यामुळे या निवडणुकीमुळे ग्रामीण व शहरांमधील राजकीय वातावरण तापलेले असतानाच आता गावा-गावांमध्ये निवडणुकांचं वारं वाहू लागणार आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका येत्या 5 फेब्रुवारी रोजी होणार आहेत. पनवेल तालुक्यातील जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणांसाठी उमेदवारीची शोधशोध सुरु असून इच्छुकांची जोरदार फिल्डिंग लावली आहे. करंजाडे विभागातील एकनाथ शिंदे शिवसेना गटाचे करंजाडे येथील तरुण तडफदार सामाजिक क्षेत्राची जाण असलेले गौरव गायकवाड यांना उमेदवारी द्यावी अशी जणसामान्यांतुन मागणी होत आहे. त्यानुसार गायकवाड यांनी जोरदार तयारी सुरु केली आहे.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकांची घोषणा होताच राष्ट्रीय समाज पक्षात इच्छुकांमध्ये रस्सीखेच!

दैनिक युवक आधार
तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे

पाथरी/ आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीची तयारी सुरू झाली आहे शहरातील निवडणूकीचा उत्साह ओसरत असतानाच आता ग्रामीण भागातील हालचालींना वेग वाढला आहे या पार्श्वभूमीवर परभणी जिल्ह्यातील राजकीय हालचाली जोरात सुरू झाल्या आहेत परभणी जिल्हा परिषदेवर मीच राष्ट्रीय समाज पक्षाचा उमेदवार असणार असे पक्षांमध्ये इच्छुक उमेदवारांची संख्या मोठी असून एका एका जागेसाठी अनेकांनी दावा केल्यामुळे राष्ट्रीय समाज पक्षांमध्ये इच्छुकांमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू झाल्याने पक्षाची नेतेमंडळी सध्यातरी उमेदवारांच्या नावांची घोषणा टाळत आहेत राष्ट्रीय समाज पक्षात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीत इच्छुक उमेदवारांनी "अभी नही तो कभी नहीं "या राजकीय महत्त्वाकांक्षाने जोरदार तयारी सुरू केली आहे तर काही जिल्हा परिषद व पंचायत समिती सर्कलमध्ये " दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला " लागणार आहे.तर अनेकांचे सोशल मीडियावर वाहू लागले अनेक उमेदवारीचे वारे यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे परभणी जिल्हाअध्यक्ष अशोक हाके यांनी सांगितले अजूनही काही सर्कलमध्ये इच्छुक उमेदवारांनी आपल्या मुलाखतीसाठी ग्रीन लीप हॉटेल स्टेशन रोड परभणी येथे राष्ट्रीय समाज पक्षाचे महासचिव पाल साहेब पक्षनिरीक्षक गोविंद सुरनर सहनिरिक्षक ओमप्रकाश चितळकर प्रभारी गोविंद मानवतकर विलास गाडवे राजाभाऊ हिंगे जिल्हाअध्यक्ष अशोक हाके यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे

# अजिंठ्यात 'नॅशनल इंग्लिश स्कूल'चा क्रीडा महोत्सव दिमाखात; घोड्यासह निघालेल्या मार्च पास्टने वेधले सर्वांचे लक्ष !

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

सिल्लोड :- तालुक्यातील अजिंठा येथील हमदर्द चॅरिटेबल ट्रस्ट संचलित नॅशनल इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धेचे अत्यंत दिमाखदार आणि उत्साहपूर्ण वातावरणात उद्घाटन करण्यात आले. मैदानावर विद्यार्थ्यांचा सळसळता उत्साह आणि शिस्तबद्ध सादरीकरणामुळे या क्रीडा महोत्सवाने अवघ्या अजिंठा परिसराचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष इकबाल अहमद हे होते.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे विद्यार्थ्यांनी घोड्यासह काढलेला शिस्तबद्ध 'मार्च पास्ट'. वाद्यांच्या गजरात आणि एका तालात पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पावलांनी उपस्थित



मान्यवरांना मंत्रमुग्ध केले. या नाविन्यपूर्ण संकल्पनेचे आणि विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. क्रीडा स्पर्धेचे रीतसर उद्घाटन संस्थेचे संचालक शेख शमशुलहक यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे सचिव जियाउलहक, संचालक शेख अमीर हमजा, शेख मोईनुलहक, संजय जाधव, अरुण चव्हाण, शेख समद, शेख तौफीक, शेख अलीम, शेख मुबाशिर, शेख शफीक, शेख अकील यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शाळेचे मुख्याध्यापक जाहिर अहमद, गुलाम खुसरो व शेख अफसर यांनी सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

अध्यक्षीय भाषणात बोलताना इकबाल अहमद म्हणाले की, "मैदानी खेळ हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहेत. क्रीडेमुळे केवळ शारीरिक विकास होत नाही, तर मानसिक बळकटी, शिस्त, संघभावना आणि नेतृत्वगुणांचाही विकास होतो. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच क्रीडा व विविध स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा तसेच हार-जीत समभावाने स्वीकारून क्रीडा भावना जपावी," असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

उद्घाटनानंतर विविध मैदानी व क्रीडा स्पर्धांना सुरुवात झाली असून, विद्यार्थ्यांनी यात मोठ्या जिद्दीने सहभाग नोंदवला आहे. कार्यक्रमाच्या शेवटी शाळा प्रशासनाच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवर, पालक व सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानण्यात आले. या क्रीडा महोत्सवामुळे परिसरात खेळाडूवृत्तीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## फोटोग्राफीची दुनिया न्यारी : महेंद्रशेठ घरत मुंबईतील प्रदर्शनात रमले महेंद्रशेठ घरत

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, वार्ताहर**

"फोटोग्राफीची मला खूप आवड आहे आणि तो माझा छंदही आहे. नवतंत्रज्ञानाने सर्वच क्षेत्रांत आमूलाग्र बदल होत आहेत.



तसेच बदल फोटोग्राफीतही झाले आहेत. त्यामुळे मुंबईतील फोटो प्रदर्शन पाहताना अत्याधुनिक कॅमेरे, डिजिटल तंत्रज्ञान, अत्याधुनिक आणि कमी वजनाच्या स्क्रीन, जबरदस्त क्लियारिटी पाहून मी हरखून गेलो आहे. एकंदरित ही फोटोग्राफीची दुनियाच न्यारी आहे," असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले. रविवारी (ता. १८) ते मुंबईत बीकेसी येथे फोटो प्रदर्शन पाहण्यासाठी गेले होते. ते पाहिल्यानंतर त्यांनी आपले मत व्यक्त केले.

यावेळी त्यांनी अनेक सुप्रसिद्ध फोटो ग्राफरांची भेट घेतली.

फोटोग्राफी व व्हिडीओग्राफी क्षेत्रात नव्याने आलेले अत्याधुनिक कॅमेरे, लेन्स, लाईटिंग सिस्टीम्स तसेच इमेजिंग क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान यांची सविस्तर माहिती त्यांनी तज्ञांकडून घेतली. बदलत्या काळात फोटोग्राफी हे क्षेत्र झपाट्याने विकसित होत असून, नवीन तंत्रज्ञान फोटोग्राफर व व्हिडीओग्राफर मित्रांनी आत्मसात करावे आणि स्वतःला सतत अपडेट ठेवावे, असे आवाहनही महेंद्रशेठ घरत यांनी यावेळी केले.

फोटोग्राफी आणि व्हिडिओ क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी असे प्रदर्शन मार्गदर्शक ठरत असून, नव्या पिढीसाठी हे तंत्रज्ञान प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

यावेळी त्यांच्यासोबत ज्येष्ठ व्हिडीओ तज्ञ सुमंत नलावडे, फोटोग्राफर लक्ष्मण ठाकूर, तसेच ओम देशमुख उपस्थित होते.

# ओरिएंटल कॉलेज ऑफ लॉ येथे DLLE फूड फेस्ट व फन 'एन' फेअर उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर उरण रायगड**

**नवी मुंबई (सानपाडा) :** ओरिएंटल कॉलेज ऑफ लॉ, सानपाडा येथे DLLE (Department of Lifelong Learning & Extension) यांच्या मार्गदर्शनाखाली "DLLE फूड फेस्ट अँड फन 'एन' फेअर" या उपक्रमाचे दि. १७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत महाविद्यालयाच्या ७व्या मजल्यावर उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले.या फेस्टिव्हलमध्ये विद्यार्थ्यांच्या उद्योजकतेला व सर्जनशीलतेला वाव देणारे विविध आकर्षक स्टॉल्स लावण्यात आले होते. त्यामध्ये पावभाजी, पाणीपुरी, शेवपुरी, मसाला वेफर्स चाट, कांदेपोहे, कपकेक, केक पॉप्स, कोल्ड्रिंक, तसेच मेहंदी काढणे, प्ले अँड अर्न यांसारख्या उपक्रमांचा समावेश होता. विद्यार्थ्यांसह प्राध्यापक, कर्मचारी व पाहुण्यांनी या फेस्टिव्हलला मोठ्या संख्येने भेट देत उपक्रमाचा आनंद घेतला.

या फूड फेस्ट व फन 'एन' फेअर अंतर्गत आयोजित स्पर्धेचे विजेते पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आले — प्रथम क्रमांक : पाव भाजी स्टॉल -अनिशा साई कुलये – ४ था वर्ष BA LLB

आदित्य गुप्ता – ४ था वर्ष BA LLB.चिंतन पटेल – २ रे वर्ष LLB

द्वितीय क्रमांक : जोई'ज स्पेशल टॅंगी टाउन,ज्योत्सना समंता – २ रे वर्ष BA LLB,राशी रायकवार – २ रे वर्ष BA LLB, तृतीय क्रमांक :

पाणीपुरी स्टॉल – मिस्बा पटेल (५ वे वर्ष BA LLB)केक पॉप्स – पेचिअम्मल (२ रे वर्ष BA LLB) या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. हर्षा गोयल (विभाग समन्वयक) उपस्थित होत्या. त्या DLLE अंतर्गत फेस्टिव्हलचे निरीक्षण करण्यासाठी महाविद्यालयात आलेल्या असून, या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांची भूमिका त्यांनी पार पाडली. हा उपक्रम ओरिएंटल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोरधन एन.देवनानी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडला. DLLE समन्वयक सहाय्यक प्राध्यापक ऋतुजा चव्हाण व सहाय्यक प्राध्यापक मोहम्मद अशरफ यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विजेत्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले तसेच सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे त्यांच्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल व उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल विशेष कौतुक करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासाला, संघभावनेला व उद्योजकतेला चालना मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.









# पेपरफ्रायने भारतातील 'होम रिपोर्ट कार्ड रिवाइंड २०२५' प्रकाशित केले तुमचं घर सजवण्यासाठी भारतातील एकमेव आणि सर्वोत्तम गाईड

दैनिक युवक आधार
मुंबई, प्रतिनिधी

फर्निचर आणि होम गुड्स क्षेत्रातील भारतातील अग्रगण्य 'ओम्नीचॅनेल' बाजारपेठ असलेल्या 'पेपरफ्राय'ने आपले लोकप्रिय 'होम रिपोर्ट कार्ड २०२५' प्रसिद्ध केले असून, या उपक्रमाचे हे सलग तिसरे वर्ष आहे. २०२५ मध्ये भारतीय कुटुंबांनी आपल्या घरासाठी नेमकी कशी खरेदी केली, याचा सखोल आढावा या अहवालात घेण्यात आला आहे. ७०० हून अधिक शहरांमधील प्रत्यक्ष खरेदीच्या व्यवहारांवर आधारित असलेल्या या अहवालातील काही महत्त्वाच्या निष्कर्षांनुसार, आता भारतीय ग्राहक आपले संपूर्ण घर एकाच वेळी सजवण्याऐवजी, वर्षभरात हळूहळू एका-एका खोलीचा कायापालट करण्यावर अधिक भर देत आहेत. फर्निचरच्या तुलनेत होम गुड्स (घरातील वस्तू) श्रेणीतील व्यवहार दुपटीने जास्त झाल्याचे दिसून आले आहे. यात प्रामुख्याने स्टोरेज, किचन युटिलिटीज, ऑर्गनायझर्स आणि लायटिंग या वस्तूंना मोठी मागणी होती. बेंगळुरू, पुणे आणि जयपूर यांसारख्या शहरांमध्ये घराशी संबंधित एकूण खरेदीमध्ये घरातील वस्तूंचे प्रमाण निम्म्याहून अधिक होते.

भारतीय घरांमध्ये लिव्हिंग रूम (दिवाणखाना) ही आता फक्त बसण्या-उठण्याची जागा उरलेली नसून त्या घरातील व्यक्तींचे व्यक्तिमत्व आणि सामाजिक विचार व्यक्त करणारे सर्वात महत्त्वाचे स्थान बनले आहे. लिव्हिंग रूममधील फर्निचरच्या बाबतीत ग्राहकांचा कल लक्षणीयरीत्या वाढला असून, केवळ गरजेपोटी खरेदी करण्याऐवजी जीवनशैली उंचावण्याच्या उद्देशाने नियोजनबद्ध बदल करण्याकडे लोकांचा कल दिसून येत आहे. सोफा बदलण्याचा




कालावधी आता मोठ्या प्रमाणात कमी झाला असून, ग्राहक साधारणपणे दर ४ वर्षांनी आपला सोफा बदलत आहेत. बेडरूमच्या बाबतीत, संपूर्ण देशभरात क्वीन-साईज बेड आणि गाद्यांची मागणी आजही कायम आहे.

श्री आशिष शाह, सह-संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, पेपरफ्राय म्हणाले की,"पेपरफ्रायच्या 'होम रिपोर्ट कार्ड २०२५'ची तिसरी आवृत्ती प्रसिद्ध करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. नेहमीप्रमाणेच, हा अहवाल केवळ भविष्यातील अंदाजांवर आधारित नसून, पेपरफ्रायवरून लाखो कुटुंबांनी प्रत्यक्षात केलेल्या खरेदीवर आणि त्यांच्या वर्तणुकीवर आधारित आहे. भारतीय घरे आता अधिक व्यक्तिगत आवडीनिवडी, व्यावहारिक दृष्टिकोन आणि विचारपूर्वक कशी सजवली जात आहेत, याचे दर्शन हा अहवाल घडवतो. दरवेळप्रमाणेच यामध्ये प्रादेशिक आवडीनिवडी आणि पसंतीबाबतची रंजक माहिती देण्यात आली आहे. यावर्षी पेपरफ्रायवर अनेक नवीन डी2सी (थेट ग्राहकांपर्यंत) ब्रँड्स लाँच झाल्यामुळे, ग्राहक आता अधिक चोखंदळ झाले असून ते वैशिष्ट्यपूर्ण आणि डिझाइन-केंद्रित उत्पादनांना पसंती देत आहेत. यावर्षी देखील पेपरफ्राय ग्राहकांसाठी आणि ब्रँड्ससाठी 'फॅशन फॉर होम' चे हक्काचे ठिकाण बनण्याचे आपले ध्येय अधिक जोमाने पुढे नेईल."

श्री कुलभूषण अतकर, मार्केटिंग आणि फर्निचर कॅटेगरी हेड, पेपरफ्राय म्हणाले,"पेपरफ्रायच्या 'होम रिपोर्ट कार्ड २०२५' मधून एक गोष्ट स्पष्टपणे समोर येते, ती म्हणजे ग्राहक आता अधूनमधून घर सजवण्याऐवजी सातत्याने घर घडवण्यावर भर देत आहेत. आता ग्राहक खरेदीसाठी सण-उत्सव किंवा नवीन घराची वाट पाहत बसत नाहीत, तर वर्षभरात छोटे पण खात्रीशीर निर्णय घेऊन घर अपग्रेड करत आहेत. ब्रँड्स आणि मार्केटर्ससाठी ही विचार करण्याची नवी दिशा आहे. ग्राहकांच्या जीवनातील विविध टप्पे, ऋतू आणि खास क्षणांनुसार जेव्हा त्यांचे घर बदलासाठी तयार असेल, तेव्हा योग्य सोल्यूशन्स उपलब्ध करून देणे हेच यशाचे गमक ठरेल; केवळ कॅलेंडरमधील तारखा पाहून चालणार नाही."

यावर्षी डिझाइनच्या बाबतीत 'लायटिंग' (रोषणाई) हा सर्वात मोठा बदल म्हणून समोर आला आहे. महानगरांमध्ये हँगिंग लाइट्स आणि वॉल लॅम्प्सनी सॉफ्ट डेकोरच्या इतर वस्तूंना मागे टाकले आहे. भारतातील होम गुड्सच्या एकूण मागणीमध्ये टियर-२ शहरांचा वाटा ४० टक्क्यांहून अधिक राहिला आहे. गोवा, नागपूर, कोची आणि भोपाळ यांसारख्या शहरांनी घराची सजावट आणि उपयुक्तता वाढवणाऱ्या वस्तूंमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे.

## मुंबई महानगरपालिकेत महायुतीचाच महापौर होणार..

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :-**

शिवसेना आणि भाजप हे मुंबई महानगरपालिकेत महायुती एकत्र निवडणूक लढले असून मुंबईत महायुतीचा महापौर होईल असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर यासह महायुती म्हणून जिथे जिथे एकत्र निवडणूक लढलो त्याठिकाणी महायुतीचाच महापौर बनवण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

मुंबईमध्ये महानगर निवडणूकध्ये कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसल्याने, आणि शिवसेनेने आपले नगरसेवक पंचतारांकित हॉटेलमध्ये ठेवल्याने याबाबत अनेक तर्क वितर्क लावण्यात येत होते. मात्र या सर्व शंकाकुशंकांना पूर्णविराम देत मुंबित महायुतीचाच महापौर होईल असे शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. मुंबईकर नागरिकांनी मोठ्या विश्वासाने महायुती म्हणून सेना - भाजपला मतदान केले असून त्यांच्या मतांशी प्रतारणा करून कोणताही वेगळा निर्णय शिवसेना घेणार नाही. नागरिकांनी याबाबत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असेही ते म्हणाले.

यासोबतच ज्या ज्या मनपामध्ये शिवसेना भाजप हे महायुती म्हणून एकत्र निवडणूक लढले आहेत तिथेही महायुतीचाच महापौर बसविण्यात येईल असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे मुंबईसह महाराष्ट्रात अन्य काही राजकीय समीकरणे तयार होत असल्याबद्दल सुरू असलेल्या चर्चांमध्ये अजिबात तथ्य नसून मुंबईत शिवसेना भाजप रिपाइं महायुतीचा महापौर होईल असे त्यांनी सांगितले.

# बाळापूर मधील महिलांची उघड्यावर शौचाची मजबुरी: नगरपालिकेच्या भोंगळ कारभाराचा पर्दाफाश

**धर्माबाद प्रतिनिधी :**
**गिरमाजी सुर्यकार**

बाळापूर शहरातील प्रभाग क्रमांक ४ ( महालक्ष्मी नगर) मधील तळ्याच्या बाजूला असलेले बाथरूम स्वच्छतेच्या मूलभूत सुविधांचा अभाव आजही महिलांच्या प्रतिष्ठेला आणि आरोग्याला आव्हान देत आहे. शासनाने 'स्वच्छ भारत' अभियानांतर्गत कोट्यवधी रुपये खर्च करून सार्वजनिक शौचालये व बाथरूमची उभारणी केली असली, तरी प्रत्यक्षात त्यांची देखभाल आणि दुरुस्ती न झाल्यामुळे या सुविधा नागरिकांसाठी निरुपयोगी ठरत आहेत.

प्रभाग क्रमांक ४ ( महालक्ष्मी नगर) असलेले सार्वजनिक बाथरूम अनेक वर्षांपासून मोडकळीस आले असून दरवाजे तुटलेले, पाणीपुरवठा बंद, स्वच्छतेचा अभाव आणि दुर्गंधी यामुळे महिलांना त्याचा वापर करणे अशक्य झाले आहे. परिणामी, या परिसरातील अनेक महिलांना आजही उघड्यावर शौचाला जाण्याची लाजिरवाणी मजबुरी सहन करावी लागत आहे.

या परिस्थितीमुळे महिलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत

## बाथरूम वर्षानुवर्षे देखभालीविना, नागरिकांचे आरोग्य धोक्यात

असून संसर्गजन्य आजारांचा धोका वाढत आहे. लहान मुले, वृद्ध महिला आणि गरोदर महिलांसाठी ही स्थिती अधिकच धोकादायक ठरत आहे. रात्रीच्या वेळी उघड्यावर जाण्यामुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

स्थानिक नागरिकांनी वारंवार नगरपालिकेकडे तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. "दरवर्षी कर भरतो, पण सुविधा मात्र शून्य," अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली आहे. काही महिन्यांपूर्वी पाहणीचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र प्रत्यक्षात कोणतीही दुरुस्ती किंवा स्वच्छता करण्यात आलेली नाही.

या गंभीर समस्येकडे नगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन प्रभाग क्रमांक ४ मधील सार्वजनिक बाथरूमची दुरुस्ती व पुनर्बांधणी करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा महिलांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा प्रश्न आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



*दुर्गादास तम्मलवाड , साईनाथ सुन्नापोड, मुत्यन्ना पडगिलवार व अनेक कार्यकर्त्यांनी नगरपालिकेला दिले निवेदन*

नगरपालिकेच्या या निष्क्रियतेमुळे 'स्वच्छ भारत' योजनेचा बट्ट्याबोळ होत असून शासनाच्या योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचत नसल्याचे स्पष्ट दिसून येते. बाथरूमची तातडीने दुरुस्ती, नियमित स्वच्छता, पाणीपुरवठा आणि प्रकाशव्यवस्था सुरू करणे अत्यावश्यक आहे.

## रोजगारक्षम कौशल्य क्षमता विकास कार्यशाळा -विद्यापीठातील विविध पदव्युत्तर विभागातील १२०० विद्यार्थ्यांना मिळणार प्रशिक्षण

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात रोजगार कौशल्य क्षमता विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. महिंद्रा अँड महिंद्रा प्राइड क्लासरूम अंतर्गत नांदी फाउंडेशनच्या वतीने आयोजित ३ विभागात कार्यशाळेचा शुभारंभ सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आला.

विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर शैक्षणिक विभागात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये रोजगारक्षम कौशल्य विकसित व्हावे या उद्देशाने रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने या कार्यशाळेचे आयोजन जानेवारी व फेब्रुवारी महिन्यांमध्ये करण्यात आले आहे. ३ दिवसीय कार्यशाळेत विद्यार्थ्यांना कौशल्य विकसित करीत रोजगारासाठी तयार केले जाणार आहे. माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनशास्त्र विभाग, भौतिकशास्त्र विभाग आणि प्राणीशास्त्र विभागात सोमवार दि. १९ जानेवारी २०२६ रोजी कार्यशाळेत सुरुवात करण्यात आली. रसायनशास्त्र विभागातील कार्यशाळेच्या शुभारंभ कार्यक्रमाला विभाग प्रमुख तथा आयक्यूएसी संचालक डॉ. नंदकिशोर करडे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. उमेश पलीकुंडवार, रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन, प्रशिक्षक मेघना दुबे, डॉ. विजय तांगडे यांची उपस्थिती होती.

भौतिकशास्त्र विभागातील उद्घाटन या कार्यक्रमाला विभाग प्रमुख डॉ. संजय ढोबळे, रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन, डॉ. अभय देशमुख, डॉ. स्मिता आचार्य तथा प्रशिक्षक अॅड. पल्लवी माटे यांची उपस्थिती होती. प्राणीशास्त्र विभागातील उद्घाटनीय कार्यक्रमाला विभाग प्रमुख डॉ. वंदना धुर्वे, डॉ. भूषण महाजन, प्रशिक्षक नव्या मोहता यांची उपस्थिती होती. प्राणीशास्त्र विभागातील कार्यक्रमात डॉ. भूषण महाजन यांनी कार्यशाळेच्या आयोजनाबाबत माहिती दिली. रोजगार तसेच नोकरी प्राप्त करण्यासाठी मुलाखतीला जाण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी कोणती तयारी करावी. आपले परिचय पत्र कसे तयार करावे. मुलाखत कशाप्रकारे द्यावी, या सोबतच रोजगारक्षम होण्याच्या दृष्टीने कौशल्य प्राप्त करता यावे याबाबत तीन दिवशीय कार्यशाळेत सविस्तर प्रशिक्षण दिल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. वंदना धुर्वे यांनी स्पर्धेच्या युगात मुलाखतीच्या दृष्टीने आपली सर्वोत्तम तयारी असावी याकरिता या कार्यशाळेत विशेष प्रशिक्षण दिले जाणार असल्याचे सांगितले. पूर्वी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या संधी प्राप्त होत नव्हत्या. आपल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय तसेच शासकीय कंपन्यांमध्ये नोकरीची संधी मिळावी या दृष्टीने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घेण्याचे त्यांनी आवाहन केले. या सोबतच विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांमध्ये टप्प्याटप्प्याने या कार्यशाळेचे आयोजन केले जाणार आहे.



## महागाव नगरीत जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचा पादुका दर्शन सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**एम डी सुरोशे**
**महागाव (यवतमाळ)**

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांतर्गत अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी रामानंदाचार्य दक्षिणपीठ नाणिजधाम यांचा पादुका दर्शन सोहळा व प्रवचन दर्शन सोहळा रविवार दिनांक : 18 जानेवारी 2026 रोजी महागाव शहरातील क्रीडा संकुल, नवीन पोलीस वसाहतीच्या मागे, आठवडी बाजार समोर, महागाव शहर ,जिल्हा यवतमाळ पश्चिम येथे उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमासाठी उमरखेड महागाव चे आमदार मा. श्री किशनराव वानखेडे साहेब,माजी आमदार राजूभाऊ नगरधने साहेब,महागाव च्या नगराध्यक्षा सौ.सुनंदाताई दिलीप कोपरकर, उमरखेड च्या नगराध्यक्षा सौ.तेजश्री संतोषराव जैन,मा.श्री तातू भाऊ देशमुख साहेब,श्री शैलेश कोपरकर साहेब,उमरखेडचे सदस्य अविनाश अग्रवाल साहेब,महागाव पोलीस उपनिरीक्षक श्री निळे साहेब,उमरखेड नगरसेवक श्री गजेंद्र ठाकरे साहेब, राजू कवाने साहेब, राजू शिंदे साहेब, सामाजिक कार्यकर्ते अंबादास धुळे साहेब, पश्चिम विदर्भ पिठाचे पीठ प्रमुख श्री कुंडलिकराव वायभासे साहेब,पीठ सहप्रमुख संजय खंडागळे साहेब,जिल्हा निरीक्षक गोविंद उपासे,पीठ समितीचे अमर ईधोळ, माधव घोडे, वामनराव मोटे, प्रवीण कदम, महागाव तालुका अध्यक्ष रामदास ठाकरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



जगद्गुरुश्रींच्या सिद्ध पादुका नगराध्यक्षा सौ. सुनंदाताई दिलीप कोपरकर यांच्या निवासस्थानी होत्या. त्यांनी खूप सुंदर व्यवस्था केली होती. या वेळी महागाव शहरातून जगद्गुरुश्रींच्या सिद्ध पादुकांची सजवलेल्या रथा मधून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभा यात्रेमध्ये अनेक देखावे सादर करण्यात आले. त्यामध्ये निशानधारी महिला,निशानधारी पुरुष, कलशधारी महिला, डफली पथक,बँड पथक,भजनी मंडळ,राम पंचायतन आदी पथकांचा समावेश होता. पादुकांचे संतपिठावर आगमन झाल्यानंतर जगद्गुरुश्रींची सामुदायिक आरती संपन्न झाली. रथांमधील यजमान बोरकर संत पिठाजवळील यजमान सतीश उरकुडे हे सपत्नीक होते.सामाजिक उपक्रमांतर्गत निराधार महिला लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते 13 शिलाई यंत्राचे वाटप करण्यात आले. ज.न.म. प्रवचनकार सौ.आशाताई राऊत यांचे सुमधुर असे प्रवचन संपन्न झाले. ताईंनी प्रवचन सेवेच्या माध्यमातून उपस्थित सर्व भक्तगणांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर गुरु पूजन, उपासक दीक्षा,जगद्गुरुश्रींचे अमृततुल्य ऑनलाईन प्रवचन,सिद्ध पादुका दर्शन सोहळा,रक्तदान शिबिर,पुष्पवृष्टी, सांगता आरती असे विविध कार्यक्रम संपन्न झाले. याच कार्यक्रमात 231 भक्तगणांनी उपासक दीक्षा घेतली. कार्यक्रमास 5000 ते 6000 हजार भाविकांची उपस्थिती होती. दिवसभर येणाऱ्या सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन भारत भाऊ वानखेडे व अभिलाष कदम यांनी केले तर सर्वांचे आभार जिल्हाध्यक्ष गजानन गरवारे यांनी मानले.

हा नयनरम्य सोहळा यशस्वी करण्यासाठी जिल्हा समिती,तालुका समिती,सेवा केंद्र समिती , आरती केंद्र समितीचे पदाधिकारी,युवासेना, हिंदू संग्राम सेना, महिला सेना, प्रवचनकार, गुरु सेवक ,प्रोटोकॉल अधिकारी, आजी व माजी पदाधिकारी जिल्ह्यांतील भक्तगण गुरुबंधू व गुरु भगिनी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक हेच ध्येय;
## पनवेलमध्ये रस्ता सुरक्षा शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान जानेवारी २०२६ च्या निमित्ताने विद्यार्थी वाहक संस्था, पनवेल यांच्या वतीने आयोजित सुरक्षित वाहतूक मार्गदर्शन शिबीर व कार्यशाळा काळण समाज मध्यवर्ती सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक हेच आमचे ध्येय या ब्रीदवाक्याला अनुसरून झालेल्या या उपक्रमात वाहतूक नियमांचे महत्त्व, चालकांची जबाबदारी आणि पालकांची भूमिका यावर सविस्तर प्रबोधन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता स्कूल बस व व्हॅनच्या भव्य रॅलीने करण्यात आली. या रॅलीद्वारे पनवेल शहरातील नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. शिस्तबद्ध वाहतूक, वेगमर्यादा, सीटबेल्ट व हेल्मेटचा वापर याबाबत घोषवाक्यांच्या माध्यमातून संदेश देण्यात



आला. रॅलीनंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून मुख्य कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. या कार्यक्रमाला आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार बाळाराम पाटील, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते हरीश बेकावडे, नगरसेवक सुमीत झुंझारराव, नगरसेविका आर्या जाधव, माजी नगरसेवक शंकर म्हात्रे यांच्यासह अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. धामणी येथील ज्ञानाई माध्यमिक विद्यालय तसेच वाकडी येथील आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे माध्यमिक शाळेचे सुमारे सव्वादोनशे विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले. विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले व वाहतूक नियमांचे पालन करण्याची प्रतिज्ञा देण्यात आली. आरटीओ निरीक्षक पृथ्वीराज काकडे, पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने, पोलीस हवालदार मुलानी आणि पोलीस शिपाई गळवे यांनी चालक व वाहनमालकांना मार्गदर्शन केले. स्कूल बस चालवताना येणाऱ्या अडचणी, आपत्कालीन परिस्थितीतील उपाययोजना, वाहनांची तांत्रिक तपासणी, विद्यार्थ्यांना चढ–उतार करताना घ्यावयाची काळजी याबाबत त्यांनी प्रत्यक्ष उदाहरणांसह माहिती दिली. सामाजिक कार्यकर्ते हरीश बेकावडे यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी समाजाची सामूहिक जबाबदारी अधोरेखित केली.'सारथी सुरक्षा सेवा'चे प्रवक्ते विनय मोरे यांनी रस्ता सुरक्षा विषयावर प्रभावी व्याख्यान देत चालकांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन निर्माण केला.विद्यार्थी वाहक संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग हुमणे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पदाधिकारी व सभासदांनी या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यशाळेला शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक तसेच स्कूल बस चालक–मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात सहभागी सर्वांनी नियम पाळू अपघात टाळू" हा संकल्प व्यक्त केला.या शिबिरामुळे पनवेलमधील विद्यार्थी वाहतूक अधिक शिस्तबद्ध, सुरक्षित आणि जबाबदार होईल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचे मत पालक व शिक्षकांनी नोंदवले.

# धारावी ठाकरेंची !

**दैनिक युवक आधार**
**मुबंई (दत्ता खंदारे ):**

मुंबई महानगरपालिकेचा निकाल लागला आणि पुन्हा एकदा धारावीत उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे तब्बल चार उमेदवार जिंकून आले. यात सौ अर्चना अविरत शिंदे (वार्ड क्रमांक १८६), हर्षला मोरे (वार्ड क्रमांक १८९), जोसेफ कोळी (वार्ड क्रमांक १८७),जगदीश थिवालप्पी



(वार्ड क्रमांक १८५)यांनी बहुमताने विजय संपादन केला. एकेकाळी या सर्व प्रभागात काँग्रेसचे वर्चस्व असायचे. काँगेसचेच नगरसेवक निवडून यायचे परंतु २०१७ पासून वारे फिरले आणि ठाकरेंनी धारावी काबीज केली.धारावी बचाव माध्यमातून केलेले आंदोलन, सतत होणाऱ्या सभा यातून ठाकरे गटाचा विस्तार आणि त्यांच्या नगरसेवकांच्या कामाच्या जोरावर ठाकरे गट धारावीत मजबूत स्तिथीत आहे. यावेळी मनसे तून उभे असलेले पारुबाई कटके आणि ठाकरे गटाचे माजी नगरसेवक वसंत नकाशे यांची पत्नी वर्षा नकाशे यांनी कडवी झुंज दिली. थोड्या फार मताने त्यांचा पराभव जरी झाला असला तरी मनसे आणि ठाकरे गट हे प्रतिस्पर्धेला चांगलेच पुरून उरले असून भविष्यात त्यांना तिकडे चांगली संधी मिळेल यात शंका नाही.

लाडक्या बहिणींचा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धारावीत घेतलेल्या सभेचा तसेंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धारावीत केलेल्या धावत्या दौऱ्याचा धारावीतील मतदारावर काहीच परिणाम झाला नाही. उलट ठाकरे गटाचे चार उमेदवार जिंकून आले यातून धारावी बचाव आंदोलनास अधिक बळकटी मिळेल आणि धारावी करांना ५०० चौ. फुटाचे घर मिळवण्यासाठी आंदोलनास धार मिळेल. निवडून आलेल्या उमेदवारांनी जोमाने काम करून धारावीचा विकास करावा. चांगले रस्ते,मैदान आणि जनतेच्या सुखसुविधा यांना प्रथम प्राधान्य देऊन कामाला लागावे.भविष्यात धारावीत आमदार ठाकरे गटाचा होईल यात शंका नाही.

# पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांच्या आदेशाचे पाटोद्यात कडेकोट पालन.
## हेल्मेट न वापरणाऱ्यांवर शासकीय कार्यालयाबाहेर थेट कारवाई...



**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**

- बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या आदेशानुसार पाटोदा शहरात हेल्मेट सक्तीबाबत कडेकोट अंमलबजावणी करण्यात येत आहे. दुचाकी अपघातांमधील मृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेंतर्गत पाटोदा पोलीस स्टेशन कडून सर्व शासकीय कार्यालयांच्या बाहेर थेट कारवाई करण्यात येत आहे. या कारवाई दरम्यान पाटोदा पोलीस स्टेशनचे पी.एस. आय.पवार साहेब, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक कल्याण बाबासाहेब तांदळे तसेच इतर पोलीस कर्मचारी उपस्थित राहून हेल्मेट न वापरणाऱ्या दुचाकी चालकांवर कारवाई करत आहेत. विशेष बाब म्हणजे या मोहिमेत कोणालाही सूट देण्यात येत नसून, सामान्य नागरिकांसह शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या वर ही नियमभंग केल्यास तात्काळ दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. हेल्मेट वापरणे ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून जीवनरक्षक उपाय असल्याचे नागरिकांना समजावून सांगत पोलीस प्रशासनाकडून जनजागृती ही करण्यात येत आहे. पाटोद्यातील नागरिकांनी नियमांचे पालन करावे व स्वतःच्या सुरक्षिततेसाठी नेहमी हेल्मेट वापरावे, असे आवाहन पाटोदा पोलिसांकडून करण्यात आले आहे. पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांच्या सूचनेनुसार ही मोहीम पुढे ही सातत्याने व कठोरपणे राबविण्यात येणार असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# राष्ट्रीय सुरक्षा अभियान 2026 अंतर्गत पनवेलमध्ये भव्य वाहतूक नियम जनजागृती स्कूल बस रॅली

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(वार्ताहर):**

राष्ट्रीय सुरक्षा अभियान 2026 निमित्त पनवेल शहर वाहतूक शाखा, कळंबोली परिवहन विभाग, कळंबोली वाहतूक शाखा व काळज समाज मध्यवर्ती यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच पनवेल रिक्षा विद्यार्थी वाहक संस्था, पनवेल यांच्या सहकार्याने जनतेमध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती करण्यासाठी भव्य स्कूल व्हॅन व बस रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर रॅली खांदेश्वर शिवमंदिर, आदई तलाव, नवीन पनवेल सिग्नल, वीर सावरकर चौक ते काळज समाज हॉल, पनवेल या मार्गावरून काढण्यात आली. या रॅलीमध्ये पनवेल शहर वाहतूक शाखेची पीटर मोबाईल, पनवेल बीट मार्शल वाहन, कळंबोली वाहतूक शाखेची पीटर मोबाईल तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय कळंबोली यांची सरकारी वाहने, अधिकारी व अंमलदार सहभागी झाले होते. यासोबतच पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेच्या सुमारे 35 ते 40 स्कूल बसेस रॅलीत सहभागी झाल्या होत्या.

वाहतूक नियम जनजागृती रॅलीची सांगता काळज समाज हॉल, पनवेल येथे करण्यात आली. त्यानंतर याच ठिकाणी वाहतूक नियम मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक, पनवेल विद्यार्थी वाहक संघटनेचे चालक, सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आमदार विक्रांत पाटील यांनी उपस्थितांना वाहतूक सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करत वाहतूक नियम पाळण्याचे आवाहन केले. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने यांनी विद्यार्थ्यांशी व पालकांशी थेट संवाद साधत वाहतूक नियम पाळण्याचे महत्त्व स्पष्ट केले. वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे होणाऱ्या अपघातांचे सांख्यिकी विश्लेषण सादर करून जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमासाठी पनवेल शहर वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार अमीर मुलाणी, युवराज येळे, महेंद्रसिंग राजपूत, महेंद्र गळवी, सचिन बुधवंत आदी अंमलदार तसेच मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.



# आश्रमशाळा मरसुळ चे स्नेहसम्मेलन : प्रतिभा व जल्लोषाचा संगम

**दैनिक. युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी / राजु गायकवाड**

महात्मा मुंगसाजी आदिवासी शिक्षण संस्था, पुसद व्दारा संचालित महात्मा मुंगसाजी आदिवासी आश्रमशाळा, मरसुळ ता. पुसद येथे दि. 18 जानेवारी रोजी उड्‌डान सपनो की..... 2026

चे वार्षीक स्नेहसम्मेलन एका अविस्मरणीय सोहळया प्रमाणे संपन्न झाले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी, मा. ॲड शिवाजीराव मोघे (माजी मंत्री), उध्दघाटक – मा. ना. इंद्रनिलभाऊ नाईक (राज्य मंत्री अदिवासी विभाग तथा पालक मंत्री गोंदिया जिल्हा) तसेच विशेष अतिथी जगत गुरु जनार्धन महाराज, मा. माधवराव वैद्य (माजी आयुक्त), मा. जितेंद्र मोघे (अध्यक्ष म.मु. आदिवासी शिक्षण संस्था, पुसद), मा. ज्ञानेश्वर तडसे (उपाध्यक्ष), मा. शामराव व्यवहारे (सचिव) तसेच प्रमुख अतिथी मा. ॲड सुनिल ढाले, मा. बाबुसिंग आडे, मा. श्रीराम पवार, मा. प्रकाश पाटील बोंबले, मा. रनविर पाटील, तसेच नगरपरिषद सदस्य मा. अभिजित पानपटटे, मा. विशाल घाटे, मा. गजानन टाले (सरपंच बान्सी), मा. गजानन टारफे (सरपंच हर्षी), मा. सचिन सोनुने (सरपंच मोखाड), मा. बिबिशन राठोड, मा. शामराव राठोड, मा. सजन राठोड, मा. कैलास ससाने (पो.उ.नी) व्यासपिठावर उपस्थित होते.

कार्यक्रमास मोठा जनसमुदाय उपस्थित होता. कार्यक्रमाची सुरुवात, मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन व फित कापुन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्तावीक शाळेचे प्राचार्य ए.जि. सय्यद यांनी केले. प्रास्ताविकेतुन आश्रम शाळेतुन घडलेल्या प्रतिभावंत माजी विद्यार्थ्यांची माहिती नमुद केली. शाळा व्यवस्थापन करित असलेल्या शालेय प्रगती बददल माहिती देवुन समाजातील विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढण्या करीता कनिष्ठ महाविद्यालय सलग्न वरिष्ठ महाविद्यालय स्थापन करण्याची मा. राज्य मंत्री महोदयाकडे आग्रहाची विनंती केली. आश्रमशाळेतील



प्रतिभावंत माजी विद्यार्थ्यांचा, गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच क्रिडा स्पर्धेतील राज्यस्तरावर अमरावती विभागाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या वयोगट 17 वर्षे खो-खो मुलीच्या संघाचा कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. मोघे साहेब, मा. इंद्रनिलभाऊ नाईक, मा. जितेंद्र मोघे व इतर मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह देवुन गौरविण्यात आले. यामध्ये डॉ. संजय देविदास डाखोरे (MBBS, MS), डॉ. राजेश नथ्थुजी डाखोरे (MBBS, MS), डॉ. मानिक साहेबराव बोंबले (MBBS, MS), डॉ. विश्रांती पांडुरंग मळघणे (MBBS, MS), कु. माहेश्वरी बाळु शिकरे (MBBS, Appear) तसेच मार्च-2025 च्या माध्यमिक परिक्षेत आदिवासी विभाग अमरावती मधुन प्रथम क्रमांक प्राप्त कु. निकिता श्रीराम घुकसे 92.80% व HSC विज्ञान शाखेचा सुमित प्रकाश दुम्हारे 81.50% गुण घेवुन पुसद प्रकल्पातुन प्रथम आला. तसेच शिक्षण विभागा मार्फत राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कु. संचिता रविंद्र राठोड हीने कास्य पदक प्राप्त केल्या बाबत गौरविण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष मा. जितेंद्र मोघे यांनी सामाजिक व शैक्षणिक कार्यावर विचार व्यक्त केले. तसेच आश्रमशाळा करीत असलेली निरंतर शैक्षणिक प्रगती, स्पर्धा परिक्षा, क्रिडा स्पर्धा, राबवित असलेले नवोपक्रम या बाबत समाधान व्यक्त केले. उदघाटकीय भाषणामध्ये मा. राज्य मंत्री इंद्रनिलभाऊ नाईक यांनी आश्रमशाळेतील प्रतिभावंत गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणा करीता आश्रमशाळा सलग्न वरिष्ठ महाविद्यालय स्थापन करण्याचे आश्वासन दिले. तसेच कर्मचारी भरती बाबत आश्वस्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष, मा. ॲड शिवाजीराव मोघे (माजी मंत्री) यांनी प्रतिभावंत माजी विद्यार्थी, गुणवंत विद्यार्थी यांचा गौरव केला व आश्रमशाळा व्यवस्थापन कर्मचारी यांचे अभिनंदन केले व भविष्यात आश्रमशाळेतील विद्यार्थी IAS, IPS होतील अशी सदिच्छा अपेक्षा व्यक्त केली. स्नेहसम्मेलनातील विद्यार्थ्यांचे कलाविष्कार पाहुन कौतुक केले.


या स्नेहसम्मेलनात विद्यार्थ्यांचे कलाविष्कार पारितोषीक वितरण तसेच प्रतिभा आणि जल्लोश यांचा संगम होवुन हे वार्षीक स्नेहसम्मेलन अविस्मरनिय पर्वनी ठरले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन, श्वेता लिलाधर मळघणे आणि प्रा. एस.बि. चव्हाण, वाय.आय. परसुवाले यांनी केले तर आभार प्रदर्शन पि.आर. पाझारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता शाळेचे युवा संचालक लीलाधर

# कु प्रज्ञा विजय चव्हाण जिल्हा परिषद पंचायत समितीसाठी इच्छुक

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती करिता निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून शुक्रवारी 16 जानेवारीपासून नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यासाठी सुरवात झाली आहे.त्यामुळे इच्छुक कार्यकर्त्यांनी आपली उमेदवारीसाठी मोर्चे बांधणी सुरू केली आहे.

सणसर लासुर्णे जिल्हा परिषद व पंचायत समिती गटासाठी अनुसूचित मागास प्रवर्ग महिला आरक्षण असल्याने सणसर येथील कु प्रज्ञा विजय चव्हाण ही उच्चशिक्षित युवती इच्छुक असून त्यांचे वडील श्री विजय प्रभाकर चव्हाण हे श्री छत्रपती शिक्षण संस्थेमध्ये शिक्षक पदावर कार्यरत असून इंदापूर तालुक्यातील सणसर विविध कार्यकारी सोसायटीचे माजी चेअरमन म्हणून काम केले आहे.इंदापूर तालुक्याचे आमदार व महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे धडाडीचे व एकनिष्ठ कार्यकर्ता असल्याने राष्ट्रवादीकडून त्यांच्या नावाची चर्चा सुरु असल्याची माहिती मिळत आहे.तसेच श्रीमती शोभा प्रभाकर चव्हाण ग्रामपंचायत सणसरच्या माजी सदस्या असून कु प्रज्ञा विजय चव्हाण ही नात आहे.तसेच सणसर गावचे पोलीस पाटील राजेंद्र प्रभाकर चव्हाण यांची पुतणी आहे त्यामुळे कु प्रज्ञा हिस राजकीय व सामाजिक कार्याची त्यांना जाण आहे गटातील प्रत्येक गावातील प्रमुख नेत्यांच्या भेटीगाठी सुद्धा



चालू केल्या आहेत.

कु प्रज्ञा विजय चव्हाण या उच्चशिक्षित असल्यामुळे आणि सणसर गावात चाळीस वर्षाहुन आजपर्यंत जिल्हा परिषदचे सदस्य पद मिळाले नसल्याने सणसर गावातील नेते मंडळी हे कु प्रज्ञा विजय चव्हाण यांच्या उमेदवारीसाठी आग्रही भूमिका घेणार असल्याची ग्रामस्थामध्ये चर्चा सुरु आहे. अद्याप पर्यंत राष्ट्रवादी पक्षाने अधिकृतपणे उमेदवारांच्या नावांची घोषणा केली नसली तरी सणसर - लासुर्णे जिल्हा परिषद गटात जिल्हा परिषदसाठी किंवा सणसर पंचायत समिती गणासाठी सणसर गावची कन्या कु.प्रज्ञा विजय चव्हाण यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# महिलांच्या हाती आता केवळ पाळण्याची नाही, तर समाजाची दोरी :– न्यायमूर्ती किशोर संत

## पाटोदा येथे विधी सेवा प्राधिकरणाच्या मेगा लीगल कॅम्पला उस्फूर्त प्रतिसाद

दैनिक युवक आधार

पाटोदा (प्रतिनिधी) - अन्यायाची जाणीव होणे ही मूलभूत गरज आहे आणि हक्कांची जाणीव होणे हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. भारत हा लोकशाही प्रधान देश असून, राज्यघटना हा लोकशाहीचा कणा आहे आणि 'सर्वांना न्याय' हेच तिचे अंतिम उद्दिष्ट आहे. अशा महाशिबिरांमधून प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि न्यायव्यवस्था यांच्यात योग्य समन्वय साधला जातो, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. बदलत्या काळात महिलांच्या हाती आता केवळ पाळण्याची दोरी नाही, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे, असे स्पष्ट व परखड मत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती किशोर संत यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या संकल्पनेतून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड तसेच तालुका विधी सेवा समिती, पाटोदा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी पाटोदा येथे मेगा लीगल कॅम्प (महाशिबिर) आयोजित करण्यात आला. या शिबीराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमास न्यायमूर्ती किशोर संत यांच्या सह जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सय्यद वहाब, बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर जिल्हाधिकारी धार्मिक, पाटोदा न्यायालयाचे न्यायाधीश एम.ए.शिंदे, पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष अॅड.बी.आर.लवूळ यांची प्रमुख उपस्थिती होती. न्यायमूर्ती किशोर संत पुढे म्हणाले की, समाजामध्ये कायद्याविषयीची जाणीव आणि माहिती अत्यंत आवश्यक आहे. वाद सामोपचाराने मिटल्यास समाज अधिक सुसंस्कृत आणि सुदृढ बनतो. विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून गरजूंना योग्य न्याय मिळू शकतो. आर्थिक न्याय हे संविधानाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट असून, शासनाच्या विविध योजनांमधून आर्थिक सबलीकरण शक्य आहे. मात्र अनेकदा योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत नाही. अशा शिबिरांमधून ही दरी भरून काढता येते आणि मोठे सामाजिक उद्दिष्ट साध्य होते. महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांना न्याय, आत्मसन्मान आणि आर्थिक उन्नती मिळू शकते. 'मी स्वावलंबी झाले' ही भावना महिलांच्या चेहऱ्यावर दिसणे हेच खरे यश आहे. कायद्याविषयी जागरूकता वाढली, तर अन्याय आपोआप कमी होतो. जो समाज कायद्याने चालतो, तो समाज निश्चितच प्रगती करतो, असे ही त्यांनी ठामपणे नमूद केले. या पूर्वी बोलताना जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर यांनी सांगितले की, गरजू नागरिकांना कायदे विषयक सेवा सुलभपणे उपलब्ध व्हाव्यात, या साठी अशा प्रकारच्या शिबिरांचे आयोजन करण्यात येते. महा आदालतींमधून सामोपचाराने प्रकरणे मिटल्यास न्यायालयीन शुल्काची परतफेड ही केली जाते. मनोधैर्य योजना या सारख्या योजनांमधून अत्याचारग्रस्त महिलांना आर्थिक मदत व आधार दिला जातो. तसेच हिट अँड रन प्रकरणांमध्ये मृत व्यक्तीच्या वारसांना विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून दोन लाख रुपयांची मदत दिली जाते, अशी माहिती ही त्यांनी दिली. बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी आपल्या भाषणात सांगितले की, मागील काही कालावधीत बीड जिल्ह्यात पोलीस दल अधिक आधुनिक करण्यावर भर देण्यात आला आहे. नागरिकांचे हित डोळ्यासमोर ठेवून पोलीस प्रशासन काम करत आहे. कोणताही गुन्हा घडत असल्यास तो सहन न करता तात्काळ पोलिसांना कळवावा. बीड पोलीस सदैव नागरिकांच्या सेवेत तत्पर आहेत. कायद्याच्या दृष्टीने बीड जिल्ह्याला प्रगत बनवण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहमान यांनी सांगितले की, प्रशासन, पोलीस आणि न्यायव्यवस्था या तीन ही यंत्रणा अशा महाशिबिरांमधून एकत्र येतात. बीड जिल्ह्यात आतापर्यंत ५० हजार घरकुले पूर्ण झाली असून, उर्वरित काम चार महिन्यांत पूर्णत्वास जाणार आहे. दोन लाख घरकुले मंजूर असून, सुमारे १,००० कोटी रुपयांचे वितरण गाव पातळीवर गोरगरिबांपर्यंत झाले आहे. आर्थिक व्यवस्था मजबूत करणे हेच गरिबी निर्मूलनाचे प्रमुख साधन आहे. बालविवाहाचे मुख्य कारण गरिबी असून, ती दूर करण्यासाठी आर्थिक सबलीकरण आवश्यक आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. या वेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सय्यद वहाब यांनी आपल्या मनोगतातून विधी सेवा योजनांची माहिती दिली. पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष अॅड.बी.आर.लवूळ यांनी आयोजनाची संधी दिल्याबद्दल आभार मानले. पाटोदा न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश एम.एस.शिंदे यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व प्रमुख न्यायाधीश, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, प्रशिक्षणार्थी पोलीस अधीक्षक राहुल कुमार, उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख, तहसीलदार दत्तात्रय निलावाड, मुख्याधिकारी अभय कुमार जोशी, पाटोदा नगराध्यक्षा दिपाली जाधव, गटविकास अधिकारी उद्धव सानप, गटशिक्षणाधिकारी हनुमंत गव्हाणे, पोलीस निरीक्षक विनोद घोळवे, विविध प्रशासकीय विभागांचे प्रमुख, बँक अधिकारी, नागरिक, विद्यार्थी व वकील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी सर्व मान्यवरांचा पाटोदा वकील संघाच्या वतीने सन्मान करण्यात आला.

पाटोदा शहरात मागील अनेक दिवसांपासून या भव्य दिव्य प्रशासकीय महाशिबिराची जय्यत तयारी सुरू होती. पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालयाच्या प्रशस्त प्रांगणात हा कार्यक्रम पार पडला. प्रशासनासह सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. अत्यंत शिस्तबद्ध आणि न्यायालयीन सुसंस्कृतीत हा कार्यक्रम पार पडला.

महिला बचत गट, दिव्यांग बांधव, वन विभाग, शेतकरी लाभार्थी, घरकुल लाभार्थी अशा विविध योजनांच्या लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात लाभांचे वितरण करण्यात आले. सुमारे १४ ते १५ विभागांचे तसेच महिला बचत गटांचे माहिती स्टॉल्स लावण्यात आले होते. मान्यवरांनी या स्टॉल्सची पाहणी करून समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जरेवाडी येथील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. पाटोदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कला गीताने उपस्थितांची मने जिंकली. बीड येथील रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'मौन सोडा' हे पथनाट्य अत्यंत प्रभावी आणि आक्रमक शैलीत सादर केले. या सर्व कलाकारांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



# आर्ट ऑफ लिविंग स्वयंसेवकांकडून मादळमोही परिसर स्वच्छ

**दैनिक युवक आधार**
**गेवराई प्रतिनिधी भीमराव गावडे -** :दिनांक १८ जानेवारी 2026 वार-रविवार रोजी आर्ट ऑफ लिविंग संस्थेच्या स्वयंसेवकांच्या वतीने मादळमोही परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमांतर्गत मादळमोही ग्रामपंचायत परिसर, मारुती मंदिर, स्मशान भूमी तसेच आजूबाजूचा परिसर सखोलपणे स्वच्छ करण्यात आला.



या वेळी स्वयंसेवकांनी रस्ते, सार्वजनिक ठिकाणे व मंदिर परिसरातील कचरा संकलित करून परिसर स्वच्छ व सुशोभित केला. स्वच्छतेबाबत जनजागृती करत नागरिकांनी परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहनही करण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरात स्वच्छतेबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी स्वयंसेवकांच्या कार्याचे कौतुक केले.

या स्वच्छता मोहिमेत आर्ट ऑफ लिविंग संस्थेचे स्वयंसेवक सक्रिय सहभागी झाले होते .आर्ट ऑफ लिविंग प्रशिक्षक मा.श्री माऊली भैय्या दोबाले यांनी विशेष योगदान दिले.

# राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत देवरी (गोंदिया)प्रकल्पाचे नेत्रदीपक यश

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी (गोंदिया)**

आदिवासी विकास विभागांतर्गत येणाऱ्या शासकीय व अनुदानित आश्रम शाळांच्या विद्यार्थ्यांसाठी नुकत्याच अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या मैदानावर पार पडलेल्या *राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत* *देवरी* प्रकल्पाने अविश्वसनीय कामगिरी करत लक्ष वेधून घेतले आहे. नागपूर विभागाने सर्वसाधारण उपविजेतेपद पटकावताना या यशात *देवरी प्रकल्पाचा* मोलाचा वाटा ठरला.

देवरी प्रकल्पातून एकूण *७६* विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाले होते. यापैकी *३१* विद्यार्थी वैयक्तिक क्रीडा प्रकारात तर *४५* विद्यार्थी सांघिक खेळांत उतरले. वैयक्तिक प्रकारात *९ विद्यार्थ्यांनी १२* वेगवेगळ्या क्रीडा प्रकारांमध्ये उत्कृष्ट प्राविण्य मिळवले. सांघिक खेळांत हँडबॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी आणि खो-खो मध्ये देवरी प्रकल्पाच्या संघांनी जबरदस्त कामगिरी करत आपली सांघिक ताकद सिद्ध केली.

हे भव्य यश मिळविण्यामागे प्रकल्प अधिकारी *श्री. उमेश काशीद* यांचे मार्गदर्शन, क्रीडा समन्वयक *श्री. सुनील भुसारी व श्री. तुलसीदास बघाडे* यांचे सूक्ष्म नियोजन, राष्ट्रीय खेळाडूंच्या मार्गदर्शनाखाली बीजेपार आश्रम शाळेत दिले गेलेले विशेष प्रशिक्षण, संतुलित आहार, पुरेसे क्रीडा साहित्य आणि मुख्याध्यापक *श्री. अशोक इस्कापे* यांची समर्पणाची वृत्ती महत्त्वाची ठरली.




या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रकल्प अधिकारी श्री. उमेश काशीद यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रत्येकी *१,००० रुपये* बक्षीस देण्याची घोषणा केली आहे. तसेच वैयक्तिक प्रकारातील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी *३,५००* रुपये तर सांघिक खेळांतील विजेत्या संघातील प्रत्येक खेळाडूला *१,०००* रुपये बक्षीस जाहीर केले आहे.

हे यश आदिवासी विद्यार्थ्यांच्या खेळाडू वृत्ती, जिद्द आणि सर्वांगीण विकासाचे उत्तम उदाहरण आहे. या यशाने इतर प्रकल्पांसाठी प्रेरणा मिळाली असून भविष्यातील स्पर्धांसाठी नवे ध्येय निश्चित झाले आहे.

# श्री मलंगगड वर फ्युनिक्युलर सेवा सुरु; २ तासांचा तिरकस डोंगरी प्रवास आता फक्त १० मिनिटांत

दैनिक युवक आधार

निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी

---------------------------------

१३ वर्षे रखडलेला १९३ कोटींचा प्रकल्प पूर्ण; यात्रेकरू, स्थानिक रहिवासी व पर्यटन उद्योगाला मोठा दिलासा

--------------------------

कल्याणजवळील श्री मलंगगड (हाजी मलंगगड) येथील बहुप्रतिक्षित फ्युनिक्युलर रेल्वे सेवेचे रविवारी विधिवत उद्घाटन होऊन नियमित कामकाजाला सुरुवात झाली. सुमारे १.२ किलोमीटर लांबीच्या या आधुनिक सेवेच्या सुरूवातीमुळे डोंगराळ तीर्थक्षेत्रापर्यंत पोहोचण्याचा पूर्वी सुमारे दोन तासांचा कष्टदायक पायी प्रवास केवळ १० मिनिटांत पूर्ण होणार आहे. त्यामुळे विशेषतः जेष्ठ नागरिक, लहान मुले आणि आरोग्याच्या अडचणी असलेल्या भाविकांना मोठा दिलासा मिळणार आहे.हिंदू आणि मुस्लिम दोघांसाठीही पूजनीय असलेले हे तीर्थक्षेत्र हिंदूसाठी 'श्री मलंगगड मंदिर' तर मुस्लिमांसाठी 'हाजी मलंग दर्गा' म्हणून ओळखले जाते. वार्षिक यात्रेदरम्यान येथे राज्यासह देशभरातून लाखो भाविक येतात. या पार्श्वभूमीवर फ्युनिक्युलर सेवेचे उद्घाटन हे यात्रेकरूंसाठी एक ऐतिहासिक मैलाचा दगड ठरत आहे.या सेवेचे उद्घाटन भाजप आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते, भाजप आमदार सुलभा गायकवाड यांच्या उपस्थितीत करण्यात आले. विशेष उपक्रम म्हणून प्रकल्प कंत्राटदाराने ही सेवा पहिल्या दोन दिवसांसाठी भाविकांना विनामूल्य उपलब्ध करून देण्याची घोषणा केली. यामुळे यात्रेकरूंच्या समाधानात भर पडेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.२००४ मधील प्रस्ताव ते २०२६ मधील प्रत्यक्षात आलेला प्रकल्पश्री मलंगगड फ्युनिक्युलर रेल्वे प्रकल्पाची संकल्पना सर्वप्रथम २००४ मध्ये आमदार किसन कथोरे यांनी मांडली होती. मात्र प्रशासकीय प्रक्रिया, तांत्रिक बाबी आणि बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे प्रकल्प अनेक वर्षे रखडला. अखेर २०१२ मध्ये प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात झाली. परंतु विधानसभा मतदारसंघांचे सीमांकन, बदलते प्राधान्यक्रम आणि निधीअभावी काम पुन्हा मंदावले. यानंतर तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि सध्याचे भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी प्रकल्पाला गती देण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद केली. त्यानंतर कामाला पुन्हा वेग आला. अंदाजे १९३ कोटी रुपयांच्या खर्चाचा हा प्रकल्प सुरुवातीच्या आराखड्यानुसार मार्च २०१५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु अत्यंत कठीण भूप्रदेश, खडकाळ आणि तिरकस डोंगर उतार, वारंवार बदलणारी हवामानाची परिस्थिती अशा अभियांत्रिकी आव्हानांमुळे प्रकल्पाला अनेक वेळा विलंब सहन करावा लागला.फ्युनिक्युलरचे प्रत्यक्ष बांधकाम सुमारे १३ वर्षे चालले. गेल्या वर्षी काम पूर्ण झाले असले तरी सुरक्षा मान्यता, तांत्रिक चाचण्या, प्रमाणपत्रे आणि विविध विभागांकडून मंजुरी




मिळण्यात वेळ लागल्याने उद्घाटन जवळजवळ वर्षभर उशिरा झाले. सर्व तांत्रिक आणि सुरक्षा अडथळे दूर झाल्यानंतर अखेर ही सेवा भाविक व पर्यटकांसाठी खुली करण्यात आली आहे.२,६०० पायऱ्यांऐवजी सुरक्षित १० मिनिटांचा प्रवासपूर्वी मलंगगड मंदिर व दर्ग्यापर्यंत पोहोचण्यासाठी भाविकांना सुमारे २,६०० पायऱ्या चढाव्या लागत. प्रखर ऊन, पाऊस, वारा आणि तिरकस चढ यामुळे हा प्रवास कष्टदायक तर ठरायचाच, पण अनेकदा अपघातांचा धोका देखील निर्माण होत असे. विशेषतः जेष्ठ नागरिक, महिला, लहान मुले आणि काही आरोग्य समस्या असलेल्या यात्रेकरूंना हा चढ अधिकच त्रासदायक होता.नवीन फ्युनिक्युलर रेल्वे सेवा सुमारे ७० कर्मचाऱ्यांच्या ताफ्याद्वारे संचालित केली जाणार आहे. एका वेळेस १२० प्रवाशांना वाहून नेण्याची क्षमता असलेल्या या सेवेचे भाडे प्रति ट्रिप १५० रुपये इतके निश्चित करण्यात आले आहे. अत्याधुनिक ब्रेकिंग सिस्टीम, आपत्कालीन थांबवण्याची व्यवस्था, नियमित देखभाल आणि प्रशिक्षित कर्मचारीवर्ग यांच्या मदतीने ही सेवा सुरक्षित, वेगवान आणि अधिक विश्वासार्ह ठरेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. पर्यटनाला नवी चालना, स्थानिकांच्या उपजीविकेला बळहाजी मलंगगड परिसरातील शेकडो स्थानिक लोक गेस्ट हाऊस, लहान लॉज, चहाचे स्टॉल, हॉटेल-रेस्टॉरंट, पूजासाहित्य, फुले व हार विक्री, मार्गदर्शक सेवा इत्यादी व्यवसायांवर उदरनिर्वाह करतात. फ्युनिक्युलर सेवेच्या सुरूवातीमुळे येथे येणाऱ्या भाविक आणि पर्यटकांची संख्या लक्षणीयरीत्या वाढेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.फुलांचा व्यवसाय करणारे स्थानिक व्यावसायिक इरफान खान म्हणाले, "फ्युनिक्युलर सुरू झाल्यामुळे पर्यटनाला नक्कीच मोठी चालना मिळेल. अधिक लोक सहजपणे वरपर्यंत येऊ शकतील, याचा थेट फायदा आमच्या व्यवसायाला होईल. रोजच्या बाजारहाटीसाठी खाली शहरात उतरायचा त्रास कमी होईल आणि वर जाण्या-येण्याचा वेळही वाचेल."धार्मिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण असण्यासोबतच निसर्गरम्य दृश्यांमुळे श्री मलंगगड/हाजी मलंग हे ठिकाण ठाणे, मुंबई, रायगड आणि नवी मुंबईकरांसाठी लोकप्रिय ट्रेकिंग आणि वीकेंड पर्यटन स्थळ आहे. फ्युनिक्युलरमुळे आता कमी वेळेत, कमी श्रमात आणि अधिक सुरक्षितपणे शिखरावर पोहोचता येणार असल्याने निसर्गप्रेमी, पर्यटक आणि भाविक यांचा ओघ आणखी वाढण्याची शक्यता आहे.तीर्थक्षेत्रासाठी 'गेमचेंजर' प्रकल्पतिरकस, खडकाळ डोंगर उतारावर फ्युनिक्युलर उभारणे हे अभियंता आणि तांत्रिक तज्ज्ञांसाठी मोठे आव्हान होते. मजबूत पाया, केबल सिस्टीम, संतुलन राखणारी डिझाइन, वीज आणि यांत्रिक यंत्रणा यांचा संगम साधत अत्याधुनिक मानकांनुसार हा प्रकल्प साकार करण्यात आला. धार्मिक सोयीसह पर्यटन वाढ, स्थानिकांची आर्थिक प्रगती आणि सुरक्षित, सुलभ प्रवास यांचा मेळ घालणारी ही फ्युनिक्युलर सेवा श्री मलंगगड तीर्थक्षेत्रासाठी 'गेमचेंजर' ठरणार असल्याचे मत स्थानिक तसेच प्रशासनातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे. पुढील काळात वाढत्या पर्यटक संख्येनुसार पार्किंग, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, मूलभूत सोयी-सुविधा यांचा विस्तार करण्याची गरज आहे, असा मुद्दा जाणकारांनी मांडला असून, त्यानुसार नियोजन करण्याची अपेक्षाही व्यक्त होत आहे.

# लिंबा जिल्हा परिषद सर्कलमध्ये काँग्रेसचे उमेदवार दत्ताराव मायंदळे यांचे संर्पक दौरे चालू

दैनिक युवक आधार

तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे



पाथरी/ तालुक्यातील लिंबा जिल्हा परिषद सर्कल मध्ये संर्पक दौरे करून या लिंबा जिल्हा परिषद सर्कल मधील नागरिकांच्या काय आड अडचणी या करिता दत्ताराव मायंदळे यांनी संर्पक दौरे करून समस्या जाणून घेण्यासाठी गेल्या काही दिवसांपासून या सर्कलमध्ये आपल्या कार्यकर्त्यांसह फिरत असून त्यांना या सर्कलमध्ये वाढता पाठिंबा बघता सर्कलमधील नागरिक सुध्दा अक्षरशः चांगला प्रतिसाद देत असल्याचे चित्र दिसत आहे

**पनवेल महानगरपालिकेतील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)**

पक्षाचे नवनिर्वाचित नगरसेविका प्रगती कैलास पाटील, नगरसेविका लीना अर्जून गरड, नगरसेविका आर्या प्रविण जाधव, नगरसेविका मेघना संदिप घाडगे, नगरसेविका रितिक्षा विनय गोवारी, नगरसेविका प्रिया सुनिल गोवारी, नगरसेवक उत्तम मोर्बेकर ह्यांची मातोश्री येथे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे ह्यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या ह्यावेळी शिवसेना नेते अनंत गीते, शिवसेना नेते खासदार अरविंद सावंत, शिवसेना उपनेते बबन पाटील, शिवसेना उपनेते बाळ माने, रायगड जिल्हासंपर्कप्रमुख प्रसाद भोईर तसेच इतर पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित होते.



# सिल्लोडचा महासंग्राम: युती-आघाडीची गणिते केवळ कागदावर; सत्तार-बनकर गटात 'आर-पार'चा राजकीय संघर्ष!

## नगरपरिषदेच्या विजयानंतर सत्तारांसमोर गड राखण्याचे आव्हान; ग्रामीण वर्चस्वासाठी भाजपने थोपटले दंड.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड : -** राज्याच्या राजकारणात युती आणि आघाडीची समीकरणे केवळ सोयीपुरतीच उरल्याचे चित्र सिल्लोड-सोयगावच्या मातीत उघडपणे दिसत आहे. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या निमित्ताने आमदार अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्वाखालील शिंदेसेना आणि भाजपचे प्रदेश सचिव सुरेश बनकर यांच्या गटात थेट आणि उघड संघर्ष पेटला आहे. राज्यातील विस्कळीत राजकीय स्थितीचा परिणाम आता थेट गावपातळीवर दिसत असून, वरिष्ठ स्तरावरील तडजोडींना फाटा देत स्थानिक कार्यकर्त्यांनी 'स्वबळा'चा नारा दिल्याने, उद्या बुधवारी (दि. २१) उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी सिल्लोडमध्ये राजकीय रणधुमाळी उडणार आहे.



नगरपरिषदेचा वचपा की सत्तारांचा दबदबा?

नुकत्याच पार पडलेल्या सिल्लोड नगरपरिषद निवडणुकीत आमदार अब्दुल सत्तार यांनी आपले एकहाती वर्चस्व राखत विरोधकांना धक्का दिला होता. मात्र, नगरपरिषदेतील या विजयाची पुनरावृत्ती ग्रामीण भागात होऊ नये, यासाठी सुरेश बनकर यांनी यंदा अत्यंत सावध आणि आक्रमक पवित्रा घेतला आहे. सत्तारांच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावण्यासाठी भाजपने सर्व ९ गट आणि १८ गणांमध्ये स्वतंत्रपणे तगडी मोर्चेबांधणी केली असून, ही निवडणूक आता केवळ सत्तेसाठी नसून अस्तित्वासाठी असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

मैदानात 'दिग्गज' मोहरे अन् 'होम मिनिस्टर'ची प्रतिष्ठा:

दोन्ही गटांनी आपापल्या कुटुंबातील आणि अत्यंत विश्वासू समर्थकांना रिंगणात उतरवून ही निवडणूक वैयक्तिक प्रतिष्ठेची केली आहे:

शिंदेसेना (सत्तार गट): शिंदेसेनेने आपला गड शाबूत ठेवण्यासाठी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष केशवराव तायडे यांच्या पत्नी मंगलताई केशवराव तायडे (अंधारी), जिल्हा बँक अध्यक्ष अर्जुन गाढे यांच्या पत्नी आशाताई अर्जुन गाढे (घाटनांद्रा), कल्पना संदीप सोनवणे (उंडणगाव), डॉ. विजया जाधव (केऱ्हाळा) आणि स्वतः आमदार सत्तारांचे पुत्र अब्दुल आमिर (अंभई) यांच्यासह देविदास पालोदकर (डोंगरगाव ) व राजू काळे (शिवना) यांची नावे जवळपास निश्चित केली आहेत.

भाजप (बनकर गट): सत्तारांच्या तटबंदीला खिंडार पाडण्यासाठी भाजपने केऱ्हाळ्यातून अनिताताई ज्ञानेश्वर मोठे, घाटनांद्रातून श्रुती अशोक गरुड, शिवण्यातून बेबीताई काळे, अंधारीतून ज्ञानेश्वर तायडे आणि भराडीतून वृषाली मिरकर व राधाकृष्ण काकडे अशा तगड्या उमेदवारांची फळी उभी केली आहे.

उद्या चित्र स्पष्ट होणार; डोंगरगावात 'सस्पेन्स'!

बुधवारी दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज भरण्याची अंतिम मुदत असल्याने राजकीय गोटात मोठी खळबळ उडाली आहे. विशेषतः डोंगरगाव गटात भाजप नेमका कोणता 'धक्कादायक' चेहरा समोर आणते, यावर मतदारसंघाचे भवितव्य अवलंबून आहे. एका बाजूला सत्तारांचा प्रदीर्घ अनुभव आणि दुसरीकडे भाजपची संघटित ताकद; या दोन टोकाच्या संघर्षात सिल्लोडची जनता कोणाला कौल देते, हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरेल.

# गिरनार नागरी निवारा सहकारी गृहनिर्माण संस्थेचा २५ वे रौप्यमहोत्सवी वर्ष उत्सवात साजरा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई शांताराम गुडेकर**

गिरनार नागरी निवारा सहकारी गृहनिर्माण संस्थेचा २५ वे रौप्यमहोत्सवी वर्ष उत्सवात साजरा करण्यात आला.गिरनार उत्सव समितीच्या माध्यमातून श्री सत्यनारायण महापूजा यशस्वीरित्या पार पडली.रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त संपूर्ण गिरनार परिवारातील सर्व सदस्यांनी घेतलेली मेहनत,सहभाग, योगदान खरंच वाखाणण्यासारखा होता.



यानिमित्ताने गिरनार नागरी निवारा कार्यकारी मंडळाच्या वतीने गिरनार उत्सव समिती,गिरनार महिला मंडळ,गिरनार कला मंचाचे सर्व पदाधिकारी, प्रतिनिधी, सदस्य आणि स्वयंसेवकांचे खूप खूप आभार,कौतुक आणि शुभेच्छा देण्यात आल्या. भविष्यात असेच उत्कृष्ट कार्यक्रमांच्या आयोजनाची अपेक्षा यानिमित्ताने गिरनार नागरी निवारा सहकारी गृहनिर्माण संस्था, कार्यकारिणी मंडळच्यावतीने व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रममध्ये नवग्रह पूजा विधी,सत्यनारायण पूजा विविध क्रीडा स्पर्धा,पाककला स्पर्धा,जी. पी.एल क्रिकेट टूर्नामेंट,होम मिनीस्टरसह विविध सांस्कृतिक कार्यक्रम,रेकॉर्ड डान्स,नाटक असे कार्यक्रम पार पडले.गिरनार नागरी निवारा सह.गृहनिर्माण संस्था (मर्या.) इमारत क्र. ५५, नागरी निवारा परिषद-२ दिंडोशी, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ येथे हा संपूर्ण कार्यक्रम पार पडला.इमारत कार्यकारणी

उत्सव समिती कार्यकारणी श्री.लक्ष्मण ग. जाधव अध्यक्ष),श्री.सुशिलकुमार दे. शिंदे (सचिवयुवक आधार,श्री.कैलाश स. गावडे (खजिनदार),श्रीमती सुजाता सु. कांबरे,श्री. अरविंद ल.जाधव (सचिव),श्री.वैभव दा. कदम( खजिनदार),गिरनार महिला मंडळ व सर्व रहिवाशी यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतला.

# शिवसेना उबाठा पक्षाच्या जुवाठी विभाग संपर्क प्रमुखपदी ॲड सुभाष बाणे तर नाटे उपविभाग संपर्क प्रमुखपदी सुरेंद्र करंगुटकर

**दैनिक युवक आधार**
**राजापूर:-(प्रमोद तरळ)**



पक्षप्रमुख मा. श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने, माजी खासदार विनायकजी राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली,रत्नागिरी जिल्हा संपर्क प्रमुख सहदेवजी बेटकर,

रत्नागिरी जिल्हा प्रमुख दत्ताजी कदम,

विधानसभा क्षेत्र संपर्क प्रमुख चंद्रकांतजी नकाशे,

राजापूर तालुका संपर्क प्रमुख अनिलजी भोवड
यांच्या शिफारशीने
केळवली जि. प. विभाग
नवीन जि. प. जुवाठी विभाग संपर्क प्रमुख पदी
श्री. सुभाष गंगाराम बाणे
व नाटे पंचायत गण

उपविभाग संपर्क प्रमुख पदी श्री. सुरेंद्र करंगुटकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे

ॲड सुभाष बाणे हे अखिल महाराष्ट्र कुणबी सेवा संघाचे संस्थापक सदस्य तसेच प्रथम अध्यक्ष होते. कुणबी सहकारी बँक मुंबईचे विद्यमान संचालक, कुणबी सहकारी बँक मुंबईचे लिगल ॲडव्हाजर (कायदेशीर सल्लागार) आणि जवळपास गेली २० वर्षे मुंबई उच्च न्यायालयात एक यशस्वी, निष्णात वकील म्हणून परिचित आहेत

राजापूर तालुक्यातील शिवसेना संघटना अधिक मजबूत, गतिमान व प्रभावी करण्याच्या दृष्टीने घेतलेला हा निर्णय निश्चितच पक्षवाढीसाठी दिशादर्शक ठरेल. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची सामाजिक बांधिलकी कार्यतत्परता, संघटनात्मक कौशल्य व निष्ठावंत नेतृत्वामुळे शिवसेनेची ताकद अधिक वाढेल असा ठाम विश्वास तालुक्यातील शिवसेनेकडून व्यक्त होत आहे

# वैध धंदे – दारू, वरली, मटका, गुटखा आधीपासूनच होते,दाखले द्या; नाहीतर स्टेशन सोडतो!"

## ठाणेदाराच्या वक्तव्याने नागरिक संतप्त

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी**

वाशिम एका पोलीस स्टेशन हद्दीतील ठाणेदाराच्या वादग्रस्त वक्तव्याने संपूर्ण परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. "या जगात दारू,वरली,मटका,गुटखा असे अवैध धंदे बनवणे आणि विकणे हे फक्त मी ठाणेदार म्हणून कार्यभार सांभाळल्यापासून झाले असेल तर मी दोषी आहे; पण माझ्या पदभारापूर्वी पोलीस स्टेशन हद्दीत दारू,वरली,मटका,गुटखा नव्हते याचा पुरावा द्या,मी उद्या पोलीस स्टेशन सोडून जातो," असे वक्तव्य झाल्याचे समोर आले आहे.




या विधानामुळे कायदा-सुव्यवस्थेच्या अंमलबजावणीवरच गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. वर्षानुवर्षे सुरू असलेल्या देशी-विदेशी दारू,वरली,मटका, गुटखा व इतर अवैध धंद्यांमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली असून महिलांना असुरक्षिततेला सामोरे जावे लागत आहे.तरुण पिढी व्यसनाधीन होत असताना जबाबदारी स्वीकारण्याऐवजी अशा प्रकारची भूमिका घेतली जात असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

विशेषतः महिलांकडून या वक्तव्याचा तीव्र निषेध व्यक्त होत असून, "दारू, वरली, मटका, गुटखा यांसारखे अवैध धंदे रोखणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे, दाखले मागणे नव्हे," अशी स्पष्ट भूमिका मांडली जात आहे. आता प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन कठोर पावले उचलावीत, अन्यथा नागरिकांचा कायदा-सुव्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होईल,असा इशारा जनतेतून दिला जात आहे.

१)बॉक्स.. यावर नागरिक आणि पत्रकारांचा ठाम सवाल...

पूरावे शोधणे,पाळत ठेवणे,छापे टाकणे आणि गुन्हेगार पकडणे हे ठाणेदारांचे काम आहे.अवैध धंदे समाजासमोर आणणे,अन्याय उघड करणे आणि बातमी प्रसिद्ध करणे हे पत्रकारांचे.

२)बॉक्स :

१)महिलांचा संतप्त सवाल

वर्षानुवर्षे सुरू असलेल्या दारू, वरली, मटका, गुटखा या अवैध धंद्यांकडे पोलीस दुर्लक्ष का करत होते?

२)कायदा अंमलात आणणे पोलिसांचे कर्तव्य नाही का?

३)पुरावे मागण्याऐवजी कारवाई का होत नाही?

४)आमच्या घरांची राखरांगोळी करणाऱ्या अवैध धंद्यांना संरक्षण मिळतेय का?

"आता फक्त आश्वासन नको, थेट कारवाई हवी!" – परिसरातील महिलांचा इशारा

# वाशिम पंचायत समितीचे लोकगीत जिल्ह्यात प्रथम.

## दमदार शाहिरी सादरीकरणातून विभागीय स्पर्धेसाठी निवड.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**

**वाशिम :-**जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा दिनांक १७ ते




१९ जानेवारी दरम्यान मोठ्या उत्साहात पार पडल्या. या तीन दिवसीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवामध्ये वाशिम पंचायत समितीने लोकगीत प्रकारात दमदार सादरीकरण करून जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला असून विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

हे प्रभावी व शाहिरी अंगाने सादर करण्यात आलेले लोकगीत जिल्हा परिषद शाळा, साखरा येथील आदर्श शिक्षक

श्री. दिगंबर घोडके, श्री. कुणाल व्यास व श्री. विनोद झनक

यांच्या माध्यमातून सादर करण्यात आले. पारंपरिक लोककलेचा ठसा जपत सामाजिक आशय, शाहिरी शैली आणि प्रभावी सादरीकरणामुळे या लोकगीताने उपस्थित सर्व प्रेक्षकांचे मन जिंकले.

या कार्यक्रमाला जिल्हा परिषद मधील सर्व विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्व मान्यवर व प्रेक्षकांच्या उपस्थितीत सादर झालेल्या या दमदार लोकगीत सादरीकरणाला भरभरून दाद मिळाली. लोककलावंत शिक्षकांनी सादरीकरणातून सामाजिक जाणिवा, लोकपरंपरा व सांस्कृतिक वारसा प्रभावीपणे मांडला.

या यशाबद्दल श्री. दिगंबर घोडके, श्री. कुणाल व्यास व श्री. विनोद झनक यांचे संपूर्ण जिल्हाभरातून कौतुक होत असून, विभागीय स्तरावर वाशिम जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करण्यासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# नेत्यांची मिठी,कार्यकर्त्यांच्या जखमांवर मीठ

## इंदापूरमध्ये भरणे–पाटील युती ?: राजकीय सोयीचा सौदा की तळागाळावर अन्याय?

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील राजकारणाने पुन्हा एकदा धक्कादायक वळण घेतले आहे. विद्यमान आमदार दत्तात्रय भरणे (राष्ट्रवादी –अजित पवार गट) आणि चार टर्मचे माजी आमदार हर्षवर्धन पाटील (राष्ट्रवादी –शरदचंद्र पवार गट) हे तब्बल २५ वर्षांच्या कट्टर राजकीय संघर्षानंतर अचानक एकत्र आले आहेत. पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुका खांद्याला खांदा लावून लढण्याचा निर्णय झाला असला, तरी या "राजकीय मैत्री"ची किंमत मात्र तळागाळातील कार्यकर्त्यांना मोजावी लागत असल्याचे चित्र आहे.

कालपर्यंत एकमेकांवर भ्रष्टाचाराचे आरोप, सभांमधून जहरी टीका,परस्परांवर गुन्हे दाखल, सामाजिक बदनामी, आणि काही ठिकाणी थेट संघर्षाची भाषा –हेच या दोन गटांचे वास्तव होते. गावागावांत कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झालेली दरी इतकी खोल होती की एकाच कार्यक्रमात बसणेही अशक्य वाटायचे. आज मात्र नेत्यांनी राजकीय समीकरण जुळवत अचानक हात मिळवले.

मात्र प्रश्न असा आहे – नेत्यांची लढाई संपली, पण कार्यकर्त्यांचे काय? ज्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल झाले, ज्यांची बदनामी झाली, ज्यांचे राजकीय आणि सामाजिक नुकसान झाले, त्यांना आज "सगळं विसरून एकत्र या" असा अप्रत्यक्ष आदेश दिला जात आहे. ही युती म्हणजे तळागाळातील कार्यकर्त्यांच्या भावनांवर केलेला राजकीय सौदा असल्याची चर्चा तालुक्यात जोरात सुरू आहे.

काही ठिकाणी दोन्ही गटांतील कार्यकर्ते अजूनही एकमेकांकडे संशयाने पाहत आहेत. "कालपर्यंत जो आमचा शत्रू होता, तो आज अचानक मित्र कसा?" हा प्रश्न अनुत्तरित आहे. अनेक कार्यकर्त्यांच्या मनात अजूनही जुन्या जखमा ताज्या आहेत. कोर्टकचेऱ्या, पोलिस स्टेशनच्या फेऱ्या, गावात झालेली मानहानी – हे सगळे एका राजकीय युतीमुळे पुसले जाणार नाही, हे वास्तव आहे राजकारणात युती-आघाड्या होतात, पण इंदापूरमधील ही युती केवळ निवडणूक जिंकण्यासाठी केलेली सोयीस्कर तडजोड असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.नेते मंचावर एकत्र दिसत असले,तरी तळागाळात अजूनही नाराजीचा उद्रेक आहे.

नेत्यांसाठी सत्ता महत्त्वाची,पण कार्यकर्त्यांसाठी स्वाभिमान! जर या युतीत कार्यकर्त्यांचे प्रश्न,त्यांच्यावर झालेले अन्याय, दाखल केसेस, आणि सामाजिक तणाव यावर ठोस भूमिका घेतली नाही, तर ही युती फक्त वरवरची ठरेल. आतून मात्र असंतोषाचा भडका उडण्याची शक्यता नाकारता येत नाही.इंदापूरच्या राजकारणात आज नेत्यांची मैत्री दिसत असली, तरी कार्यकर्त्यांच्या मनात अजूनही प्रश्नचिन्ह आहे –ही युती जनतेसाठी आहे की फक्त सत्तेसाठी?

# "सी.एच ए. आधार चषकाचा धडाका ! मोठी जुईच्या मैदानात रंगली माणुसकीची मॅच; अपघातग्रस्तांसाठी सामाजिक संस्था धावली!

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी**

खेळ केवळ मनोरंजनासाठी नसून तो समाजातील वंचितांच्या डोळ्यातील अश्रू पुरण्यासाठी ही असू शकतो याचा प्रत्यय उरण मध्ये आला. उरण विभागातील अपघात ग्रस्त कुटुंबीयांच्या मदतीसाठी न्हावाशेवा सी एच ए आधार सामाजिक संस्थेमार्फत रविवार दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी आयोजित सी एच ए आधार चषक २०२६क्रिकेट स्पर्धा मोठी जुई येथील "मी मराठी" मैदानात दिमाखात संपन्न झाली.



उरण विभागात सातत्याने होणाऱ्या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबांना आर्थिक आधार देणे तसेच अपघातात कायमचे अपंगत्व किंवा गंभीर दुखापत झालेल्या सीएचए बांधवांच्या मदतीसाठी अपघातग्रस्त निधी संकलित करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता या स्पर्धेतून जमा झालेला सर्व निधी सामाजिक कार्यासाठी खर्च केला जाणार आहे.

सकाळी १० वाजता मान्यवरांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात स्पर्धेचे उद्घाटन झाले. दिवसभर रंगलेल्या चुरशीच्या सामन्यानंतर सायंकाळी ६ वाजता मान्यवरांच्या शुभहस्ते बक्षीस वितरण समारंभ पार पडला. या स्पर्धेच्या नियोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष रुपेश भगत, उपाध्यक्ष श्याम गावंड, हनुमान म्हात्रे, सचिव दिनेश पाटील ,सल्लागार सुरेंद्र म्हात्रे ,चेतन मोकल, बाळकृष्ण शेडगे, दीपक गावंड,खजिनदार मिलिंद म्हात्रे यांच्यासह संपूर्ण कार्यकारिणीने विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संपूर्ण संस्थेचे गाव अध्यक्ष आणि सर्व कार्यकर्ते पदाधिकारी त्यांनी एकजुटीने काम करून ही स्पर्धा शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडली.

सि एच ए आधार चषकाचे शिलेदार ठरले प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले संघ रॉकस्टार मोठीजुई तर द्वितीय क्रमांक चे विजेते ठरले संघ इलेव्हन पाले.

खेळाच्या माध्यमातून सामाजिक भान जपणाऱ्या सीएचए आधार संस्थेच्या उपक्रमाचे उरण परिसरातून कौतुक होत आहे. मैदानावर धावणाऱ्या प्रत्येक खेळाडूचा घाम हा कोणाचे तरी आयुष्य सावरण्यासाठी कामी येणार आहे ही भावना या स्पर्धेचे खरे यश ठरली.

# शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व आणि वेशभूषा स्पर्धेचे आयोजन.

दैनिक युवक आधार
रमेश राऊत(कल्याण ग्रामिण प्रतिनिधी)

दि.२०,ठाणे : २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून ब्रह्माण्ड कट्टा परिवार आणि हेमंत पात्रे कुटुंबियांच्या वतीने 'कै. डॉ. उत्तमराव लक्षणमंराव पात्रे' यांच्या स्मरणार्थ शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व व वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा स्वातंत्र्यसंग्रामातील थोर व्यक्तिमत्त्वे, देशभक्ती आणि राष्ट्रभावना या विषयांवर आधारित असणार आहे.




स्पर्धेमध्ये इयत्ता चवथी ते सातवी गटासाठी वेशभूषा स्पर्धा तसेच इयत्ता आठवी ते दहावी गटासाठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहे. वक्तृत्व स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना तीन ते पाच मिनिटांचा वेळ देण्यात येणार असून स्वातंत्र्यलढ्यातील स्त्री–पुरुषांचे योगदान, वंदे मातरम्‌चा अर्थ तसेच 'देश माझा मी देशाचा' अशा विषयांवर भाषण सादर करावे लागणार आहे.

स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना आकर्षक पारितोषिके देण्यात येणार असून प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकासह उत्तेजनार्थ बक्षिसे व सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार आहे. स्पर्धा सोमवार, दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत मो. ह. विद्यालय, शिवाजी पथ, ठाणे येथे संपन्न होणार आहे.व पारितोषिक वितरण समारंभ ६•३०वा.संपन्न होणार आहे.

या स्पर्धेसाठी सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले नाव, शाळेचे नाव, इयत्ता व संपर्क क्रमांक नोंदवण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्पर्धा समन्वयकांनी केले आहे.आधिक माहीतीसाठी. राजेंद्र गोसावी.मधूभाष्य ९९२०७२४६२७,पंकज पडाळे.९९६७२८४०८१

# कोणतेही स्वप्न कठीण नाही, तुमची तयारी पाहिजे : महेश सावंत, फणसगाव महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिरात प्रतिपादन

दैनिक युवक आधार
तळेरे प्रतिनिधी
-गुरुनाथ तिरपणकर

असे अधिकारी बना की ज्यामुळे तुम्हाला अभिमान वाटेलच पण, तुमच्या आई वडिलांना, गुरुंना आणि संपूर्ण गावाला अभिमान वाटला पाहिजे. असे स्वप्न घेऊन जगायचे असते आणि त्यासाठी प्रचंड मेहनत आणि प्रामाणिक प्रयत्न करा. कोणतेही स्वप्न कठीण नाही, त्यासाठी तुमची तयारी असली पाहिजे, असे प्रतिपादन ध्रुव अकॅडमीचे संचालक महेश सावंत यांनी केले.

ते फणसगाव कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिरातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सत्रात बोलत होते. हे शिबिर जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा उंडिल नं.1 येथे आयोजित करण्यात आले आहे. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीप नारकर, फणसगाव पंचक्रोशी शिक्षण संस्थेचे प्रमुख कार्यवाह संदेश नारकर, प्रसिध्द व्यावसायिक राजेंद्र नरसाळे, जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर, सरपंच प्रियंका सरवणकर, महात्मा गांधी तंटामुक्ती समिती अध्यक्ष कृष्णा नर, महाविद्यालयाच्या प्राचार्य अनुश्री नारकर, अक्षरोत्सव प्रमुख निकेत पावसकर आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरादरम्यान मुलांना विविध व्याख्याने आणि प्रत्यक्षिकाद्वारे लोकशाही नेतृत्व, व्यक्तिमत्व विकास, सामाजिक जाणीव, स्वयंरोजगार व पर्यावरण संवर्धन, स्वच्छता - आरोग्य विषयी जनजागृती अशा विविध गुणांची रुजवात केली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीप नारकर म्हणाले की, ध्येय निश्चित केल्याशिवाय ध्येयासाठीचे प्रयत्न



योग्य दिशेने होत नाहीत. त्यासाठी सर्वप्रथम प्रत्येकाने आपले ध्येय निश्चित करा. त्यासोबतच नियमित वर्तमानपत्र वाचलेच पाहिजे. कारण, वर्तमानपत्र वाचन हे ज्ञानाचे भांडार आहे, त्याचा योग्य वापर करा, यश तुमचेच आहे.

यावेळी गुरुनाथ तिरपणकर, संदेश नारकर, राजेंद्र नरसाळे, प्रियांका सरवणकर यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुचिता चव्हाण तर आभार प्रा. ज्योत्स्ना कदम यांनी मानले.

# मुंबई महानगरपालिकेत महायुतीचाच महापौर होणार..

## जिथे युतीमध्ये लढलो तिथे महायुतीचा महापौर होणार –उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले स्पष्ट

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :-**

शिवसेना आणि भाजप हे मुंबई महानगरपालिकेत महायुती एकत्र निवडणूक लढले असून मुंबईत महायुतीचा महापौर होईल असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर यासह महायुती म्हणून जिथे जिथे एकत्र निवडणूक लढलो त्याठिकाणी महायुतीचाच महापौर बनवण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

मुंबईमध्ये महानगर निवडणूकध्ये कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसल्याने, आणि शिवसेनेने आपले नगरसेवक पंचतारांकित हॉटेलमध्ये ठेवल्याने याबाबत अनेक तर्क वितर्क लावण्यात येत होते. मात्र या सर्व शंकाकुशंकांना पूर्णविराम देत मुंबित महायुतीचाच महापौर होईल असे शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. मुंबईकर नागरिकांनी मोठ्या विश्वासाने महायुती म्हणून सेना - भाजपला मतदान केले असून त्यांच्या मतांशी प्रतारणा करून कोणताही वेगळा निर्णय शिवसेना घेणार नाही. नागरिकांनी याबाबत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असेही ते म्हणाले.

यासोबतच ज्या ज्या मनपामध्ये शिवसेना भाजप हे महायुती म्हणून एकत्र निवडणूक लढले आहेत तिथेही महायुतीचाच महापौर बसविण्यात येईल असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे मुंबईसह महाराष्ट्रात अन्य काही राजकीय समीकरणे तयार होत असल्याबद्दल सुरू असलेल्या चर्चांमध्ये अजिबात तथ्य नसून मुंबईत शिवसेना भाजप रिपाइं महायुतीचा महापौर होईल असे त्यांनी सांगितले.

# श्रीवर्धनमध्ये पुन्हा अघोरी विद्येचा संशयास्पद प्रकार; दांडा स्मशानभूमीत काळी बाहुली, लिंबू-टाचण्या व महिलेचा फोटो आढळला

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**



श्रीवर्धन तालुक्यात पुन्हा एकदा अघोरी विद्येचा प्रकार उघडकीस आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. श्रीवर्धन दांडा विभागातील स्मशानभूमीत काळी बाहुली, लिंबू-टाचण्या तसेच एका महिलेचा फोटो असा संशयास्पद प्रकार आढळून आला आहे. या घटनेची माहिती समजताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली.

घटनास्थळी सापडलेल्या फोटोवरून हा प्रकार श्रीवर्धनबाहेरील व्यक्तींनी केला असावा, अशी शंका ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. अशा अघोरी कृत्यांमुळे समाजात अंधश्रद्धा पसरत असून महिलांच्या सुरक्षिततेबाबतही गंभीर प्रश्न निर्माण होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची भावना असून संबंधित व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, तसेच अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने तत्काळ पावले उचलावीत, अशी ठाम मागणी नागरिकांकडून होत आहे. स्मशानभूमी परिसरात सीसीटीव्ही बसवणे, रात्रीची गस्त वाढवणे आणि अंधश्रद्धा निर्मूलनाबाबत जनजागृती करण्याची गरज असल्याचेही नागरिकांनी नमूद केले आहे.

प्रशासनाने या गंभीर प्रकाराची दखल घेऊन योग्य ती चौकशी व कारवाई करावी, अशी अपेक्षा आता श्रीवर्धनकर व्यक्त करत आहेत.

# महापौर आरक्षणावरून राजकीय हालचालींना वेग

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी**

: राज्यातील २९ महापालिकांच्या महापौर पदासाठीचे आरक्षण गुरुवारी(ता.२२ जानेवारी) जाहीर होणार असून, त्यासाठी नगरविकास राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आरक्षणाची सोडत काढली जाणार आहे. या सोडतीकडे केवळ प्रशासकीय प्रक्रिया म्हणून नव्हे, तर आगामी स्थानिक सत्तासमीकरणांची दिशा ठरवणारा टप्पा म्हणून पाहिले जात आहे.

राज्यात नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकांमध्ये भाजपसह सत्ताधारी महायुतीला बहुतेक ठिकाणी बहुमत अथवा निर्णायक आघाडी मिळाली आहे. त्यामुळे महापौरपदाचे आरक्षण कोणत्या प्रवर्गासाठी निघते, यावर सत्ता स्थापनेची रणनीती ठरणार आहे. काही महापालिकांत आरक्षणामुळे सत्ताधारी पक्षाला नेतृत्व बदलावे लागण्याची, तर काही ठिकाणी अपेक्षित चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता आहे.

विशेषतः मोठ्या आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या महापालिकांमध्ये महापौरपदाचे आरक्षण हे केवळ औपचारिक न राहता, स्थानिक पातळीवरील राजकीय संतुलन, पक्षांतर्गत गटबाजी आणि पुढील विधानसभा निवडणुकांच्या तयारीशी जोडलेले असल्याचे मानले जात आहे. त्यामुळे गुरुवारी होणाऱ्या सोडतीकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे.

आरक्षण जाहीर झाल्यानंतर विविध महापालिकांत महापौर निवडीची प्रक्रिया सुरू होईल. त्याचबरोबर सत्ता स्थापनेसाठी पक्षांतर्गत चर्चा, आघाड्या व समन्वयाच्या हालचाली अधिक तीव्र होण्याची शक्यता असून, स्थानिक राजकारणात पुढील काही दिवस निर्णायक ठरणार आहेत.

# अशोक भांडेकर यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त आठवणींना उजाळा

दैनिक युवक आधार
शिरुर कासार प्रतिनिधी



पत्रकार स्व. अशोक भांडेकर यांच्या प्रथम स्मृतिदिनी राक्षसभुवन (तांबा) येथील 'आजोळ' परिवारातील आजी- आजोबांना एकवेळचे अन्नदान करण्यात आले. यावेळी

मित्र परिवाराकडून त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. स्व. अशोक भांडेकर यांचा सोमवारी दि. १९ जानेवारी रोजी प्रथम स्मृतिदिन त्यांच्या आठवणींना उजाळा देत साजरा करण्यात आला. वृद्धाश्रमातील आजी आजोबांना एकवेळच्या गोड जेवणाच्या अन्नदानाने कायम हसरा चेहरा, स्वाभिमानी, निष्पक्ष प्रसंगी कर्तव्य कठोर असे पत्रकार स्व. अशोक भांडेकर यांना आज आपल्यातून जाऊन एक वर्ष पूर्ण झाले. पत्रकारिता क्षेत्रात त्यांचा चांगला नावलौकिक होता. आज कालिंकादेवी मंदिरामध्ये अयोजित कार्यक्रमात मित्रपरिवारांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. आजोळ परिवारातील आजी-आजोबांना एक वेळचं गोड जेवनाचे अन्नदान करण्यात आले. प्रकल्पाचे संचाल करण तांबे यांनी स्व. अशोक भांडेकर यांच्या आठवणींना उजाळा देत भांडेकर परिवाराची कृतज्ञता व्यक्त केली.

# पांढरकवड्याचे नवे ठाणेदार लहुजी तावरे यांचा 'युवा ग्रामीण पत्रकार संघटने'तर्फे सत्कार

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी - महेश पेन्दोर




पांढरकवडा: येथील पोलीस स्टेशनचे नवनियुक्त ठाणेदार श्री. लहुजी तावरे साहेब यांनी नुकताच आपला पदभार स्वीकारला असून, युवा ग्रामीण पत्रकार संघटनेच्या वतीने त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.यावेळी पत्रकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ठाणेदार तावरे साहेबांना छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट देऊन त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पांढरकवडा शहर आणि तालुक्यात कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी, तसेच सर्वसामान्यांच्या समस्या सोडवण्यासाठी पोलीस प्रशासन आणि पत्रकार यांच्यात समन्वय असणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. तावरे साहेब आपल्या कार्यकाळात तालुक्यात शांतता प्रस्थापित करतील, असा विश्वासही संघटनेने दर्शवला.सत्काराला उत्तर देताना ठाणेदार लहुजी तावरे यांनी संघटनेचे आभार मानले. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपण काम करणार असून, शहरात सुरक्षितता आणि जनतेचा विश्वास संपादन करण्याला आपले प्रथम प्राधान्य असेल, असे आश्वासन त्यांनी दिले. या प्रसंगी संघटनेचे तालुका अध्यक्ष प्रफुल नान्ने, सदस्य गणेश बेतवार आणि चेतन सामजवार उपस्थित होते.

# निवडणुकीत वंचित आघाडी, मनसे, आरपीआयला अपयश

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर

नुकत्याच झालेल्या पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी, मनसे आणि आरपीआयला खाते सुद्धा उघडता आला नाही. या तिन्ही पक्षांना पनवेल महानगरपालिकेच्या नगरसेवक निवडणुकीत अपयश आले आहे. गत निवडणुकीत आरपीआयचे दोन नगरसेवक भाजपच्या चिन्हावर निवडून आले होते. 15 आणि 16 जानेवारी रोजी पार पडलेल्या पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने 21 जागा लढवल्या असल्याची माहिती शंकर वायदंडे यांनी दिली. वायदंडे यांना 1 हजार 93 मते मिळाली. तर मनसेने सात जागांवर आपले उमेदवार उभे केले होते. आरपीआय आठवले गटाने कामोठे प्रभाग क्रमांक 12 मध्ये उमेदवारी लढवली. मात्र या तिन्ही पक्षांना एकही जागेवर आपला नगरसेवक निवडून आणता आलेला नाही. आरपीआय आठवले गटाचे प्रभाकर कांबळे यांचा अवघ्या 209 मतांनी पराभव झाला. आरपीआयमध्ये झालेल्या बंडाळीचा देखील त्यांना फटका बसला. त्यामुळे आरपीआय कार्यकर्त्यांच्या हा पराभव जिव्हारी लागला आहे. गत निवडणुकीत देखील आरपीआयने भाजप सोबत युती केली होती. त्यावेळेस आरपीआयचे दोन उमेदवार नगरसेवक म्हणून निवडून आले होते. यंदा आरपीआयला एकच जागा मिळाली. या जागेवर यंदा प्रभाकर कांबळे यांना आरपीआयकडून भाजपच्या चिन्हावर निवडणूक लढवण्याची संधी मिळाली. मात्र उद्धव सेनेच्या रितिक्षा गोवारी यांनी त्यांचा अवघ्या 209 मतांनी पराभव केला. प्रभाकर कांबळे यांना 7 हजार 990 मते मिळाली तर रितिक्षा गोवारी यांना 8 हजार 199 मते मिळाली. प्रभाग 12 मध्ये चार उमेदवारांपैकी दोन उद्धवसेनेचे उमेदवार निवडून आले. तर दोन भाजपचे उमेदवार निवडून आले.

# ओबीसी बहुजन पक्ष व काँग्रेसची आघाडी, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका एकत्रित लढणार.

## धनगर, ओबीसी, मराठा, आदिवासी सर्वच समाजाची फसवणूक करून फडणवीसांनी राज्यात जातीय संघर्ष पेटवला

## भिवंडी महानगरपालिकेतील काँग्रेसच्या नवनिर्वाचित नगसेवकांचा प्रदेशाध्यक्षांच्या हस्ते सत्कार

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :**

प्रकाश शेंडगे यांच्या नेतृत्वाखालील ओबीसी बहुजन आघाडी व काँग्रेस पक्षाची आघाडी झाली आहे. ही एक वैचारिक आघाडी असून आगामी जिल्हा परिषद निवडणुका एकत्रित लढू असा निर्णय यावेळी घेण्यात आल्याची घोषणा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज पत्रकार परिषदेत केली. ओबीसी बहुजन पक्षाचे नेते प्रकाश आण्णा शेंडगे यांनी त्यांचे सहकारी चंद्रकांत बावकर, जे. टी. तांडेल, पांडुरंग मिरगळ यांनी टिळक भवन येथे काँग्रेस प्रदेशाध्यक्षांसोबत सविस्तर चर्चा केली. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आघाडीची घोषणा केली, ते पुढे म्हणाले की, ओबीसी बहुजन आघाडीने काँग्रेससोबत काम करण्याचा निर्णय घेतला त्याचे मी स्वागत करतो.




ही आघाडी केवळ सत्तेसाठी नसून एका व्यापक भूमिकेतून सामाजिक न्यायासाठी झाली आहे. राहुल गांधी यांनी जातनिहाय जनगणनेची आग्रही मागणी केल्यानंतर मोदी सरकारला त्याचा निर्णय घ्यावा लागला पण अजून ही जातनिहाय जनगणना झालेली नाही. ज्यांची जेवढी लोकसंख्या तेवढी भागिदारी ही काँग्रेसची भूमिका आहे. राहुल गांधी यांच्या या भूमिकेला सर्व समाजातून पाठिंबा मिळत आहे. धनगर, ओबीसी समाजाचे योग्य प्रतिनिधित्व असावे यावर भर दिला जाईल. भाजपाची सत्ता आल्यावर पहिली सही धनगर समाजाच्या आरक्षणाची करेन असे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी बारामतीमध्ये २०१४ साली दिले होते पण आजपर्यंत त्याची पूर्तता केलेली नाही. फडणवीस यांनी धनगर, ओबीसी, मराठा, आदिवासी समाजाची आरक्षणाच्या नावाखाली फसवणूक केली आहे. जाती जातीत भांडणे लावण्याचे काम त्यांनी केले आहे. या समाजाचा भाजपा व फडणवीस यांच्यावरचा विश्वास उडाला आहे, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

यावेळी प्रकाश शेंडगे म्हणाले की, ओबीसी आरक्षणाचे लचके तोडण्याचे काम केले जात असून २७ टक्के आरक्षणावरही घाला घातला जात आहे. जीआर वर जीआर काढले जात आहेत पण कोणत्याच समाजाला त्याचा फायदा होत नाही. ओबीसी समाजाला न्याय मिळावा यासाठी स्वतंत्र पक्षाची स्थापना करुन समविचारी पक्षाशी आघाडी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. जातनिहाय जनगणनेची भूमिका घेतल्याबद्दल राहुल गांधी यांचे आम्ही आभार मानतो. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालीच ओबीसी आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागेल, असा विश्वास प्रकाश शेंडगे यांनी व्यक्त केला.

**भिवंडी महापालिकेतील नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार..**

भिवंडी महानगरपालिकेत काँग्रेस पक्षाचे ३० नगरसेवक विजयी झाले आहे. आज टिळक भवन येथे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते या नवनिकर्वाचित नगरसेकांचा सत्कार सोहळा पार पाडला. यावेळी अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष व माजी आमदार वजाहत मिर्झा, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष, संघटन व प्रशासन ॲड. गणेश पाटील, भिवंडी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष माजी आ. रशीद ताहीर मोमीन, प्रभारी राजेश शर्मा, प्रदेश सरचिटणीस नूर अन्सारी, जावेद फारुखी, रमाकांत भोई यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. भिवंडी महानगरपालिकेतील काँग्रेसच्या यशाबद्दल नवनिर्वाचित नगरसेवकांचे अभिनंदन करून, आगामी काळात लोकहिताच्या प्रश्नांसाठी ताकदीने काम करण्याचे आवाहन काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी यावेळी केले.

# रेल्वे मार्गाच्या कामासाठी बासर ते नवीपेठ सात दिवसांचा लाईन ब्लॉक
## दमरे'च्या नांदेड-सिकंदराबाद मार्गावर दुहेरीकरण जोमात

**दैनिक युवक आधार**
**उमरी वार्ताहर /**
**रूपेशकुमार ग.श्रीरामवार**

दक्षिणा मध्य रेल्वेच्या नांदेड-सिकंदराबाद रेल्वेमार्गावर दुहेरीकरणाचे काम जोमात सुरू झाले आहे. बासर ते नवीपेठ रेल्वेमार्गावर या साठी दि.१७ ते २३ जानेवारी दरम्यान लाईन ब्लॉक घेण्यात आला आहे. या लाईन ब्लॉकमुळे काही रेल्वे गाडयाच्या वेळापत्रकात तातपुरता बदल करण्यात आला आहे. यात दोन रेलवे गाड्या पूर्णतः रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच सहा रेल्वेगाड्या निजामाबाद ते मुदखेड दरम्यान अंशतः रद करण्यात आल्या आहेत. तर पाच रेल्वे गाड्या एक ते दोन तास उशिराने धावणार आहेत.

नांदेड विभागात यापूर्वी परभणी मुदखेड पर्यंत ८३ किलो मीटरचे दुहरीकरण पूर्ण झाले, तर, अंकाई ते छत्रपती संभाजीनगर पर्यंतचे ९८ किलोमीटरचे दुहेरीकरणाचे काम अंतिम टप्यात आहे. तसेच परभणी ते. छत्रपती संभाजीनगर १७४ किलो मीटरच्या दुहेरीकरणासाठी भूमि अधिग्रहण करण्यास सुरुवात झाली आहे. हैद्राबाद विभागातील मुदखेड-मेडचेल या रेल्वे मार्गावर नवीपेठ ते बासर काम शंभर टके पूर्ण झाले आहे. त्याच बरोबर निजामाबाद ते कामारेडडी व कामारेडडी ते मेडचेल प्रगतिपथावर आहे. दरम्यान, नवीपेठ ते बासर या रेल्वेमार्गावर दुहेरीकरणाचे काम पूर्ण झाल्यामुळे



नॉनइंटरलॉकिंग (सिंगल जोडणे) हाती घेण्यात आले आहे. याच कारणास्तव काही गाडया रद्द तर, काही अंशतः रद्द तसेच मार्गात व वेळेत, बदल करण्यात आला आहे. दरम्यान, प्रवाशांनी प्रवासाचे नियोजन करताना या तात्पुरत्या बदलांची नोंद घ्यावी व अधिक माहिती साठी रेल्वे

चौकशी केंद्र, अधिकृत रेल्वे वेबसाइट उपयोग करावा, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वेकडून करण्यात येत आहे.



***दोन रेल्वे गाड्या रद्द तर, सहा गाड्या अंशता रद्द**

निजामाबाद-नांदेड (७७६४५/७७६४६) ही १७ ते २३ जानेवारी पर्यंत पूर्णतः रद्द करण्यात आली आहे. तसेच नांदेड - निजामाबाद (११४०९) ही रेल्वे १६ ते २२ जानेवारी या कालावधीत मुदखेड-निजामाबाद दरम्यान, निजामाबाद-पंढरपूर (११४१३) १७ ते २३ जानेवारी या कालावधीत निजामाबाद-मुदखेड दरम्यान, मनमाड-धर्माबाद (१७६८७) १६ ते २२ जानेवारी या कालावधीत मुदखेड-धर्माबाद दरम्यान, धर्माबाद-मनमाड (१७६८८) १७ ते २३ जानेवारी या कालावधीत धर्माबाद-मुदखेड दरम्यान, पंढरपूर-निजामाबाद (११४१४) १७ते २३ जानेवारी या कालावधीत मुदखेड-निजामाबाद दरम्यान, निजामाबाद-पुणे (११४१०) १७ ते २३ जानेवारी या कालावधीत निजामाबाद-मुदखेड दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे.

*नांदेड-मेडचल तीन दिवस ३ तास उशिराने धावणार*

नांदेड-मेडचल (७७६०६) ही रेल्वे १७ ते २० व २३ जानेवारीला ३ तास तर, २२ रोजी ४ तास उशिराने धावणार आहे. तर, १७ रोजी विशाखापट्टणम - नदिड (२०८११) हो रेल्वे चेरालापल्ली-जनकंनपेट एक तास, काचिगुडा-नरखेड (१७६४१) १८ रोजी काचीगुडा-जनकंनपेट ५० मिनिटे, भगत कि कोठी-काचीगुडा (१७६०६) २० व २३ रोजी नांदेड विभागात ५० मिनिटे, काचीगुडा-नगरसोल (१७६६१) १८ रोजी काचीगुडा-जनकेनपेट दोन तास तर, २२ व २३ रोजी याच मागांवर एक तास उशिराने धावेल.

---

# कर्तव्याने हिरावलेला जीव पण पोलीस दल ठामपणे कुटुंबाच्या पाठीशी..
### स्व.स्वप्नील भिसे यांच्या परिवाराला जालना पोलीस दलाकडून ₹1.78 लाखांची मदत

**दैनिक युवक आधार**
**उपसंपादक महाराष्ट्र:-**
**राजू शिंदे.**

:जालना जिल्हा पोलीस दलातील आपले कर्तव्यदक्ष सहकारी स्व. स्वप्नील भिसे यांचे काही दिवसांपूर्वी अपघाती निधन झाले होते.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन लहान मुले तसेच आई-वडील असा परिवार असून, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक बनली होती.या कठीण प्रसंगी जालना जिल्हा पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांनी एकत्र येत संवेदनशीलतेचे दर्शन घडवत स्व. भिसे यांच्या कुटुंबासाठी ₹१,७८,००० (एक लाख अठ्ठ्याहत्तर हजार रुपये) इतकी



आर्थिक मदत जमा केली.दि. १३ जानेवारी २०२६ रोजी ही मदतीची रक्कम अजय कुमार बंसल पोलीस अधीक्षक,जालना यांच्या हस्ते स्व. स्वप्नील भिसे यांच्या कुटुंबाला धनादेश स्वरूपात सुपूर्द करण्यात आली.यावेळी पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी भिसे कुटुंबाचे सांत्वन करत कोणतीही अडचण अथवा समस्या निर्माण झाल्यास थेट भेटण्यासाठी आश्वस्त केले."पोलीस दल आपल्या सहकाऱ्यांच्या कुटुंबास कधीही एकटे सोडत नाही," असा मोलाचा संदेश यावेळी देण्यात आला. असून यावेळी धनादेश सुपूर्द करताना प्रल्हादराव ऐनवाड (स्टेनो),गजानन मोगल, गणेश शिंदे,कौशल्या काळे,पूजा जाधव,संजय सोनवणे तसेच भिसे परिवारातील आई, वडील,पत्नी, मुले व काका उपस्थित होते.

---

### बाळकृष्ण भोसले यांना उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार मिळाल्याबद्दल आमदार प्राजक्त तनपुरेंकडून जाहीर अभिनंदन

दैनिक युवक आधार
करण धोंगडे
वाशीम जिल्हा प्रतिनिधी

राहुरी (अहमदनगर)ग्रामीण भागातील वास्तव, शेतकरी, कामगार, महिला व तरुणांचे प्रश्न निर्भीडपणे मांडणारे पत्रकार बाळकृष्ण भोसले यांना उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार मिळाल्याबद्दल राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आदरणीय माजी आमदार प्राजक्त प्रसाद तनपुरे यांनी त्यांचे मनापासून अभिनंदन केले असून त्यांच्या पत्रकारितेचे जोरदार कौतुक केले आहे.

माजी आमदार तनपुरे यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की,पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून समाजातील वंचित घटकांचा आवाज



बुलंद करणारे कार्य पत्रकार करतात. बाळकृष्ण भोसले यांनी ग्रामीण भागातील वास्तव,अन्याय, शेतकऱ्यांचे प्रश्न व विकास प्रक्रियेत होणाऱ्या त्रुटी प्रामाणिकपणे समाजासमोर मांडल्या आहेत.त्यांची लेखणी ही जनतेसाठी लढणारी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

भोसले यांना पुणे येथील निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान त्यांच्या सातत्यपूर्ण, निर्भीड व वस्तुनिष्ठ पत्रकारितेची पावती असून या गौरवामुळे राहुरी तालुक्याचे नाव राज्यभरात अधिक उजळेल, असा विश्वास आमदार तनपुरे यांनी व्यक्त केला.त्यांनी भोसले यांच्या पुढील वाटचालीसाठी खूप साऱ्या शुभेच्छाही दिल्या.

या पुरस्कारामुळे राहुरी तालुक्यातील पत्रकार बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरातून बाळकृष्ण भोसले यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. ग्रामीण पत्रकारितेला नवे बळ मिळाल्याची भावना परिसरात व्यक्त केली जात आहे.

---

### खाद्यपदार्थ विक्रेतून विद्यार्थ्यांनी केली कमाई! मुदगल जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आनंदनगरी उत्साहात

दैनिक युवक आधार
तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे

पाथरी/ तालुक्यातील मुदगल येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा आणि त्यांच्यांत व्यावसायिक कौशल्य बुध्दीगत व्हावे या उद्देशाने मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान अंतर्गत आनंदनगरी आयोजन करण्यात आले यावेळी विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थ विक्रीतून कमाई केली यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विश्वनाथ घोडके उपाध्यक्ष अशोक नवघरे उपसरपंच राजेश घोडके सिध्देश्वर नवघरे योगेश्वरी साखर कारखाना लिंबा येथील कर्मचारी शरद विटेकर बळीराम ताटे मुंजा नवघरे महादेव नवघरे राम सुरवशे लक्ष्मण शेंगुळे




संतोष जावडे मुख्याध्यापक बोबडे व सर्व शिक्षक यावेळी उपस्थित होते यावेळी शालेय मैदानावर चिमुकल्या विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थीचे २५ स्टॉल लावले होते विद्यार्थ्यांनी स्वतः वस्तूंची विक्री करत व्यवहारांचे ज्ञान अनुभवले पालकांनी व ग्रामस्थांनी या स्टॉलवर भेट देऊन मुलांचा उत्साह वाढवून खरेदीचा आनंद घेतला अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने हा आनंदनगरी सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला

---

# दिग्रस नगर परिषदेसमोर शहरातील कचरा व्यवस्थेचा गंभीर प्रश्न; चौकशीची जोरदार मागणी

**दैनिक युवक आधार**
**दिग्रस प्रतिनिधि उमेश साखरकर**

दिग्रस नगर परिषदेमधील नगरसेवक, सभापगती व नगराध्यक्ष यांच्या समोर शहरातील कचरा व्यवस्थेबाबत एक अत्यंत गंभीर विषय ऐरणीवर आला आहे. दिग्रस शहरातील स्वच्छता व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून, विशेषतः नदीपलीकडील भागात घंटागाड्या अक्षरशः नदारद झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे नागरिकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. शहरात कचरा संकलनाच्या नावाखाली आतापर्यंत लाखो रुपयांची बिले काढण्यात आली आहेत. मात्र प्रत्यक्षात कचरा उचलण्याचे काम नियमितपणे होत नसल्याने या संपूर्ण प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी



होणे अत्यंत आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.घंटागाड्या वेळेवर न आल्यामुळे श्मशानभूमीच्या परिसरात खुलेआम कचरा टाकला जात आहे. तसेच अनेक ठिकाणी नागरिकांना घरातील कचरा जाळावा लागत असून, त्यामुळे पर्यावरण प्रदूषण वाढत आहेच, शिवाय नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होत आहे. घंटागाड्या नियमित न येण्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. संबंधित कचरा संकलन ठेकेदाराने आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात गंभीर दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे या ठेकेदारास तात्काळ काळ्या यादीत टाकून दिग्रसकरांचा पैसा वसूल करावा, अशी जोरदार मागणी होत आहे. गावलीपुरा, शाहपूरा, रमाई नगर, चांद नगर, आंबेडकर नगर, मोती नगर, आरणी बायपास आणि विठ्ठल नगर या भागांमध्ये घंटागाड्या अनेक दिवसांनी कधीतरीच येत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. परिणामी संपूर्ण शहरातील स्वच्छता व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत नगर परिषद प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलून दोषींवर कठोर कारवाई करावी व दिग्रस शहरात नियमित व प्रभावी कचरा व्यवस्थापन व्यवस्था कार्यान्वित करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

---

# आजाद समाज पार्टी (कां.) चा शेकडो कार्यकर्त्यांसह भव्य पक्षप्रवेश सोहळा संपन्न

**दैनिक. युवक आधार**
**प्रतिनिधी / राजु गायकवाड**

पुसद जिल्हा यवतमाळ येथे आजाद समाज पार्टी (कां.) तर्फे आयोजित भव्य जाहीर पक्षप्रवेश सोहळा शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सामाजिक न्याय, संविधान आणि वंचितांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या आजाद समाज पार्टी (कां.)च्या संघटनात्मक मजबुतीच्या दृष्टीने हा सोहळा अत्यंत महत्त्वाचा ठरला. कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. बाबासाहेबांच्या विचारांना अभिवादन करत संविधान रक्षणाची व सामाजिक समतेसाठी संघर्ष अधिक तीव्र करण्याची शपथ यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी घेतली. कार्यक्रमाची प्रस्तावना व प्रभावी सूत्रसंचालन शशांक खंदारे यांनी केले. प्रास्ताविकात आजाद समाज पार्टी (कां.)चे युवा जिल्हाध्यक्ष राजकुमार भगत यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट करत, "भाई चंद्रशेखर आजाद यांच्या नेतृत्वाखाली आजाद समाज पार्टी (कां.) ही संविधान, दलित, वंचित, शोषित आणि बहुजन समाजाच्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरून लढणारी ताकद आहे. येणाऱ्या काळात हा संघर्ष अधिक व्यापक होईल," असा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाचे



अध्यक्षस्थान भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष अशोक भाऊ भालेराव यांनी भूषवले. अध्यक्षीय भाषणात त्यांनी भाई चंद्रशेखर आजाद (राष्ट्रीय अध्यक्ष – भीम आर्मी व आजाद समाज पार्टी कांशीराम) यांच्या नेतृत्वाखाली भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (कां.) यांचा संयुक्त संघर्ष देशभरात मजबूत होत असल्याचे सांगितले. तसेच नव्याने पक्षात प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे त्यांनी मनःपूर्वक स्वागत केले. या सोहळ्यात शेकडो कार्यकर्त्यांनी आजाद समाज पार्टी (कां.)मध्ये अधिकृत प्रवेश केला. यावेळी संघटनात्मक जबाबदाऱ्या जाहीर करण्यात आल्या. विशाल भाऊ डाके यांची आजाद समाज पार्टी (कां.) युवा जिल्हा महासचिव, यवतमाळ पदी निवड जाहीर करण्यात आली. तसेच शशांक खंदारे यांची आजाद समाज पार्टी (कां.) युवा तालुका संघटक (ग्रामीण) व शेंबाळपिंपरी सर्कल प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली.

कार्यक्रमाला शरद खंदारे, आजाद समाज पार्टी काशीराम पुसद युवा तालुका अध्यक्ष (ग्रामीण) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी जिल्ह्यात संघटन वाढीसाठी सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने, निष्ठेने आणि बाबासाहेबांच्या विचारांवर चालत काम करण्याचे आवाहन केले. हा पक्षप्रवेश सोहळा म्हणजे आजाद समाज पार्टी (कां.)च्या संघटनात्मक वाटचालीतील एक निर्णायक टप्पा असून, भाई चंद्रशेखर आजाद यांच्या नेतृत्वाखाली येणाऱ्या काळात यवतमाळ जिल्ह्यातील राजकारणावर याचा निश्चितच प्रभाव पडेल, असा विश्वास उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. या पक्षप्रवेश सोहळ्याला आकाश चवरे, शरद खंदारे, सिद्धार्थ बरडे, अश्विन कांबळे, राहुल धुळे, करण खंदारे, स्वयम इंगळे, वैभव खरतडे, निलेश जाधव, संदीप जाधव, निशांत कांबळे, निखिल कांबळे, करण धवसे, विक्रांत उत्तमराव डाके, अमोल खंदारे, अनिकेत खंदारे, शांतीशील जाधव, वैभव सूर्यवंशी, राज कांबळे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# माजी विद्यार्थ्यांचे यश हे विद्यालयाचा खरा अभिमान – प्राचार्य सचिन खरात
### पी.एम. श्री. जवाहर नवोदय विद्यालयात रौप्य महोत्सवी माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न

दैनिक युवक आधार
करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी

वाशिम जवाहर नवोदय विद्यालयाचा पंचवीस वर्षांचा प्रवास हा गुणवत्ता, शिस्त आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचा गौरवशाली अध्याय आहे. या कालखंडात माजी विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत मिळवलेले उज्वल यश हे शाळेसाठी अभिमानाची बाब असल्याचे प्रतिपादन विद्यालयाचे प्राचार्य सचिन खरात यांनी केले.




रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त पी.एम. श्री. जवाहर नवोदय विद्यालयात आयोजित माजी विद्यार्थी मेळाव्यात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. माजी विद्यार्थ्यांचे अनुभव, मार्गदर्शन आणि योगदान हे सध्याच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून, शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांचा सहभाग सातत्याने मिळणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. अशा मेळाव्यांमुळे पिढ्यांमधील नाते अधिक दृढ होत असल्याचे ते म्हणाले.

या प्रसंगी विद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. मनीष पावसे व डॉ. सचिन साळवे (नेत्ररोग तज्ञ), सारिका कंसरे (व्याख्याता), मनोहरराव नाईक (विज्ञान ज्युनियर कॉलेज, कोंडाळा महाली) तसेच विकी खोब्रागडे (क्रिकेट प्रशिक्षक) प्रमुख उपस्थित होते.

मेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट माजी विद्यार्थ्यांना एका व्यासपीठावर एकत्र आणणे, परस्पर संबंध दृढ करणे व शाळेच्या विकासात त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे हे होते. उपप्राचार्य सुभाष लष्करी यांनी विद्यमान व माजी विद्यार्थ्यांमध्ये सातत्यपूर्ण संवाद आणि सहकार्याची गरज अधोरेखित केली.

या यशस्वी आयोजनात माजी विद्यार्थी प्रभारी राजेश कुमार ठाकूर यांनी मोलाची भूमिका बजावली. मेळाव्यादरम्यान माजी विद्यार्थ्यांनी आपले शैक्षणिक व व्यावसायिक अनुभव कथन करून सध्याच्या विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. सांस्कृतिक कार्यक्रम व सौहार्दपूर्ण संवादामुळे कार्यक्रम अधिकच संस्मरणीय ठरला.

शाळेच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत व सामूहिक सहभागाची प्रतिज्ञा घेत या रौप्य महोत्सवी माजी विद्यार्थी मेळाव्याचा उत्साहात समारोप झाला.